# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४४ ] आकोला, वऱ्हाडसमाचार सोमवार तारीख ७ माह फेब्रुवारी सन १९१० इसवी. [ अंक ६



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्य नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.


## नोटीस

नोटीस बेशमी मिरझा अब्बासबेग वल्द मिरझा अमिरबेग मुसलमान वस्ती कसबे खेड ता० मोर्शी जिल्हा उमरावती

यांस —

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुम्ही ४ चार ५ पांच वर्षांपासून आमचे तर्फे कुलमुखत्यार होते. व तुम्ही आमचे तर्फे काम केलें. आज अजमासें २०।२५ दिवस झाले तुम्ही आपले गांवास निघून गेलेत. तुम्ही आमचे तर्फे काम केलें. त्या दिवसा पासूनचा सर्व हिशोब आम्हांस ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत समजाऊन द्यावा व तुम्हांकडे हिशोबाअंतीं जी बाकी निघेल तीहि आणून द्यावी व जहागीरीसंबंधीं जे कांहीं कागदपत्र तुमचेपाशीं असतील ते सर्व आम्हांस आणून द्यावे. तुम्हांस दिलेलें मुखत्यारपत्र तुम्ही नोकरी सोडून गेलेत त्या दिवसा पासून रद्द केलें आहे. तरी आतां तुम्ही आमचे तर्फे मुखत्यार ह्या नात्यानें कोणतेंही काम करूं नये. केल्यास तें रद्द समजलें जाईल कळावें. तारीख १।२।१९१० इसवी.

सही उडदूंत

मीर खैरात अली वल्द मीर अमजत अली जहागीरदार

वर्मी बुा द० खु०

नो. नं. ट ५८

## जाहिरात.

वऱ्हाड म्युनिसीपाल कायद्यांतील कलम ८५ व ११६ तील पोटकलम ( जे ) या अन्वयें केलेले इमारती बांधणें अगर दुरुस्त करणें ह्या संबंधीं नियम एलीचपूर सिव्हील स्टेशन म्युनिसीपाल कमेटीला करणें आहेत. हे नियम ता. २२ जानेवारी सन १९१० रोजीं भरलेल्या स्पेशल कमेटींत पास झाले असून पुर्वी इमारती बांधण्या संबंधीं रेसीडेन्सी आर्डर्स नोटीफिकेशन नंबर १८७ ता. २० माहे एप्रिल सन १८९९ मध्यें प्रसिद्ध झालेले मागील नियम या नवीन नियमाच्या योगानें रद्द करून सदर्हू नियम मंजूर केले आहेत तेः—

( १ ) ज्या कोणाला कमेटीचे हद्दींत घर बांधणें अगर दुरुस्त करणें असेल त्यानें कमेटीला ह्या लगत दिलेल्या नमुन्या प्रमाणें नोटीस दिली पाहिजे.

(२) व त्या बरोबरच एक साधा नकाशा दिला पाहिजे व त्या नकाशांत खालील गोष्टी दाखविलेल्या असाव्यात.

( अ ) जेवढ्या जमीनीवर इमारत बांधणें अगर दुरुस्त करणें तिचें क्षेत्रफळ

( ब ) बांधले जाणाऱ्या अगर दुरुस्त होणाऱ्या इमारती सभोंवती खुली राहणारी जागा तिचें क्षेत्रफळ.

( क ) मोऱ्या, पायखाने, अगर हौद जुने असलेले अगर नवीन होणारे यांची जागा.

कोणते तऱ्हेची इमारत आहे. आणि ती खपरेल किंवा तनाची त्याचीही माहिती देणें.

हा नकाशा ५०० रुपयांवर किंमत होणारे घरा संबंधीं असल्यास प्रमाणांत ह्मणजे स्केलाचा असला पाहिजे. इतर घरासंबंधीं तो साधा असल्यास चालेल.

( ३ ) रस्त्याला लागून असणाऱ्या मोऱ्यावर पायऱ्या अथवा इमारतीचा पुढचा भाग कमेटीची मुद्दाम लेखी मंजुरात असल्याशिवाय बांधूं नये.

( ४ ) पायखाना बांधणें अगर दुरुस्त करणें झाल्यास तो कमेटीनें पसंत केलेल्या जागेवर व नमुन्या प्रमाणें केला पाहिजे.

( ५ ) घरांत असलेल्या सांडपाणी व घाणीचें पाणी नेणाऱ्या मोऱ्या अशा रीतीनें बांधाव्यात कीं त्या कमेटीला सोईवार तपासतां याव्यांत. व कमेटीचे परवानगीवांचून कोणतीही नाली आच्छादूं नये.

( ६ ) जो कोणी वरील नियम मोडील त्याची म्याजिस्ट्रेटापुढें चौकशी होऊन तो ५० रुपये पर्यंत दंडास पात्र होईल.

### नोटीशीचा नमुना

सेक्रेटरी. सी० स्टे. मु. कमेटी एलिचपूर

यांस

मी ह्या नोटीसीनें कळवितों कीं अमुक भागांत असलेलें अमुक नंबरचें घर बांधण्याचा अगर दुरुस्त करण्याचा माझा विचार आहे.

ह्या नोटीसी बरोबर दिलेले कागदः-

( अ ) जागेचा नमूना अथवा साधा नकाशा

( ब ) त्या जमिनीवरील माझा हक्क दाखविणारे कागदपत्राची नक्कल

( क ) इमारतीचा खालील पाया, निरनिराळे भाग व उंची दाखविणारे नकाशे.

( ड ) तयार होणारे कामाचें वर्णन

आपला नम्र सेवक अर्जदाराचें नांव

ज्या कोणांस वरील नियमास हरकत घेणें असेल त्यानें नोटीशीचे तारखे पासून एक महिन्याचे आंत कमेटीकडे आपला अर्ज द्यावा. एक महिन्याचे मुदती नंतर कोणाचेही अर्जाचा विचार केला जाणार नाहीं.

ता. ३१-१ १९१० इ.

व्हाईस चेअरमन

एलिचपूर सिविल स्टेशन म्यु०

नो० नं० ट ५९

## NOTICE

Notice is hereby given that the Ellichpur Civil Station Municipality propose to make the following Rules for controlling dogs within the limits of the Municipality under sections 132 and 116 clause ( J ) of the Berar Municipal Law. They are sanctioned in the special meeting of the Committee held on the 22 nd. January 1910, and are published for information of people living within Municipal limits:-

1. Every person who keeps any dog or dogs within the limits of Ellichpur Civil Station Municipality shall register the same in a book to be kept by the Committee for the purpose and obtain a license free of cost from the Committee, which shall be renewable on the 1st. day of April in each year.

2. Every dog so registered shall bear a brass disc bearing the number in the register. This disc shall be supplied by the Municipal Committee free of cost.

3. The disks shall be of different pattern for each period of issue and shall be of a size sufficiently distinguishable and shall bear consecutive numbers.

4. If after the issue of the license or disc granted under these rules, such license or disc is lost or destroyed, the owner shall at once report the fact to the Municipality and obtain a duplicate thereof from the Municipality. Duplicate disc will be supplied at a charge of 4 annas per disc.

5. Every person living within the limits of the Ellichpur Civil Station Municipal Committee shall be bound to give true information regarding the number of dogs owned or possessed by him, when called on to do so by the Secretary, Vice-Chairman or any person authorized in this by the Committee.

6. Any person infringing the above rules, shall on conviction by a magistrate be punished with a fine which may extend to Rs. 50/.

People objecting the above rules are requested to put in their objections within one month from the publication of the notice to the Secretary of the Committee. After which period no objections will be heard.

Vice Chairman.

Dated Ellichpur 31 Jany. 1910 Ellichpur Civil Station Municipality.

## NOTICE.

Notice is hereby given that the Ellichpur Civil Station Municipal Committee propose the following revised set of Rules regarding the erection or re-erection of buildings within Municipal Limits passed by the Ellichpur Civil station Municipal Committee, in special meeting held on 22 nd. January 1910, under section 85 and 116 Sub-section I Clause J of the Berar Municipal Law of 1886, in supercession of the previous Rules made by the Committee regarding the same and published in Residency Orders Notification No, 187 dated 20 th. April 1899.

1. Every person who intends to erect or re-erect any building within Municipal Limits shall give notice of his intention to the Municipal Committe, in the form appended to these Rules.

2. Every person who intends to erect or re-erect any Building within Municipal Limits, shall with such notice furnish a rough sketch showing:—

( a ). The area to be occupied by the building and out building to be erected or re-erected on the land.

( b ). The space to be left about the building or out building to be erected or re-erected.

( c ). The position of drains, privies or cesspools existing or to be constructed.

( d ). The nature of house and materials to be used.

The above sketch must be to the scale in the case of houses costing more than Rs. 500/-, in other cases, the sketch may be rough one.

( 3 ). No steps or projections shall be built over the road side drains without special permission in writing, of the Municipal Committee.

( 4 ). Every privy to be built or re-built shall be erected on a site and model approved by the Municipal Committee.

5. All waste water drains of sewage drains attached to the house shall be so constructed as to be easy of access and inspection by Municipal Committee and no drain shall be covered except with the permission of the Committee.

6. Any person who infringes the above Rules shall on conviction before a Magistrate be punished with fine which may extend to Rs. 50/-.

### THE FORM OF NOTICE.

To,

The Secretary.
Civil Station Municipal Committee.
Ellichpur.

Dated...........month.................19

Sir,

I hereby give you notice that I intend to erect or re-erect a building No......... in ............ward.........or......... Bazaar in accordance with the Rules made under Section 85 ( 1 ) of the Berar Municipal Law of 1886.

1. attach:—

( a ). Site plan or rough sketch

( b ). A certified copy of the document showing any authority to occupy the land.

( c ). Plans, Section and elevation.

( d ). Specification of the work intended to be constructed.

I have the honor to be
sir
your most obedient servant
name and address.

Any person objecting to the above Rules is required to put in his petition of objection within one month from the date of this notice—after which period, no objection will be considered by the Committee.

Vice Chairman,
Ellichpur Civil Station,
Municipality.

नो. नं. ट ६०

# वर्तमानसार.

ट्रान्सव्हालांतील हिंदी लोकांच्या दुःस्थितिबद्दल बादशहा पार्लमेंट उघडण्याच्या वेळच्या आपल्या भाषणांत उल्लेख करणार आहेत.

वंगभूमीची पूजा करण्याकरितां जमविण्यांत आलेल्या वर्गणीस हातभार लावला नाहीं ह्मणून एका खेड्यांतील पोष्ट मास्तरास दहशत घातली होती. त्याबद्दल नागेंद्र, बिपिन व कृष्ण या तिघां बंगाल्यांवर खटला करण्यांत आला होता, या खटल्यांचा निकाल देण्यांत येऊन नागेंद्रास १२ महिने, बिपिन यास ९ महिने व कृष्ण यास ६ महिने, अशा शिक्षा देण्यांत आल्या. वरील तिन्ही बंगाली मुलें पोष्ट मास्तराला चोप देऊन त्याच्या घरांत शिरलीं होतीं.

ता. २ रोजीं प्रो. परमानंद यांचेवरील खटल्याच्या चौकशीचें काम चाललें होतें. पोलिस सुपरिंटेंन्डन्ट मि. बीटी यांची आरोपीच्या वकीलानें फेर तपासणी केली अॅडव्होकेट मि. पेटमन यांनीं प्रो. परमानंद यांना आलेलें एक पत्र कोर्टांत दाखल केलें. या पत्रांत लेखक श्री. परमानंदास बंधु नांवानें संबोधून लिहितो कीं ब्रिटिश तिजोरी हस्तगत करण्यास पुरे होतील इतके विद्यार्थी इंग्लंडांत आहेत.

मॅजिस्ट्रेटच्या चौकशीचें काम पुरें झालें आजरोजीं अनंत लक्ष्मण कान्हेरे यांजवर इ. पि. को. क. ३०२ या कलमान्वयें आरोप ठेवून खटला हायकोर्टाकडे वर्ग केला आहे. दुसऱ्या सहा असामींवर खुनास मदत केल्याचा आरोप ठेवण्यांत आला आहे. आरोपींचीं नांवें आणि त्यांजवर कोणत्या कलमान्वयें आरोप ठेवण्यांत आले तें येणेंप्रमाणें:—

कृष्णाजी गोपाळ कर्वे, विनायक नारायण देशपांडे, कलम ३०२ आणि १३४ शंकर रामचंद्र सोमण, वामन ऊर्फ दाजी नारायण जोशी, दत्तात्रय पांडुरंग जोशी, गणेश बळवंत वैद्य, ३०१ व १९० (३).

ता. १ फेब्रुवारीपर्यंत लिबरल पक्षांतील २७३ लेबर पक्षांतील २४१, युनियनिस्ट पक्षापैकीं २७१ व नॅशनलिस्ट पक्षांतील ८२ याप्रमाणें सभासद निवडून आले आहेत. अद्याप ३ सभासद निवडावयाचे आहेत.

सुमारें ९।१० महिन्यांपूर्वीं चंद्रनगर येथें एक भयंकर दरवडा पडला होता. कलकत्त्याचे नांवाजलेले व अनेक वेळां शिक्षा भोगलेले कांहीं दरवडेखोर त्या चोरींत होते. त्या पैकीं ५ इसमांना हौग्याच्या पोलिसांनीं पकडून चंद्रनगरास पाठविलें होतें. त्यांची चौकशी तेथील फ्रेंच अधिकाऱ्यापुढें चालली होती. त्यां पैकीं एक इसम अटकेंत असतांनाच मरण पावला. बाकीच्या चौघांपैकीं २ इसमांस प्रत्येकीं ७ वर्षें व दुसऱ्या दोघांस प्रत्येकीं ५ वर्षें याप्रमाणें सक्तमजुरीची शिक्षा देऊन शिवाय २० वर्षें पर्यंत त्यांनीं फ्रेंच मुलखांत येऊं नये अशी मॅजिस्ट्रेटांनीं शिक्षा दिली आहे.

दक्षिण महाराष्ट्रांतील इचलकरंजी व विशाळगड, हा संस्थानच्या अधिपतींना श्रीमंत छत्रपति महाराज साहेबांकडून १९०३ व १९०५ सालीं जे विशेष अधिकार देण्यात आले होते ते कोल्हापुर सरकारानें काढून घेतल्याचें ता० २० जानेवारी १९१० चे कोल्हापुरसरकारी ग्याझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे.

सुमारें ३० वर्षें वयाचा एक मद्रासी सॅनिटरी इन्स्पेक्टर इंग्लंडहून सिडने नांवाच्या फ्रेंच स्टीमर मधून ता. २८ रोजीं मुंबई बंदरावर येऊन उतरत होता तोंच पोलिसांनीं त्यास पकडून त्याचें सामान शोधलें, त्यांत एक ब्राउनिंग पिस्तुल व १८ गोळ्या सांपडल्या. त्याचें नांव सी. आर. राव असून तो मद्रासेस सॅनिटरी इन्स्पेक्टर होता. थोड्या दिवसांपूर्वीं तोच विलायतेस सॅनिटरी इन्स्पेक्टरचें काम शिकण्यास गेला होता. डे० कमि. मि. व्हिन्सेंट यांनीं बिगरपरवाना हत्यार व दारुगोळा आणिला या आरोपावरून त्यास पकडून चौकशीसाठीं त्याजला मि. ड्रेकप यांजपुढें उभें केलें. तीन तास पर्यंत त्याच्या चौकशीचें काम चालून मॅजिस्ट्रेटनीं त्यास २॥ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा दिली. आपल्यापाशीं पिस्तुल व गोळ्या कशा आल्या हें आपणास मुळींच माहीत नाहीं असें आरोपीनें आपल्या जबाबांत सांगितलें. चौकशीचें काम गुप्त रीतीनें चाललें होतें, या मद्रासी गृहस्थापाशीं राजद्रोही मजकुराच्या कांहीं लहान लहान चोपड्या असून त्या त्यानें आपल्या पायांतील बुटांत व शर्टच्या आंत दडवून ठेविल्या होत्या असेंही चौकशी अंतीं निष्पन्न झालें आहे. त्याच्या जवळ बाँब तयार करण्याच्या कृतीचीं सचित्र पुस्तकेंही होतीं.

गेल्या आठवड्यांत "जपान" बोटींतून बराच दारूगोळा सरकारांत आला होता. त्या पैकीं रिव्हॉल्व्हरचीं काडतुसें असलेली एक मोठी पेटी बंदरांतूनच चोरीस गेली आहे. ही पेटी धक्यांतून कशी नाहींशी झाली तें कांहींच कळत नाहीं. बंदरावरील अधिकारी आश्चर्यचकित झाले आहेत. तपासाचें काम चालू आहे. अद्याप कांहींएक सुगावा लागला नाहीं.

आज ता. (३१) दहाव्या जाट पलटणीनें कलकत्त्याहून सिंध हैदराबादेकडे कुच केलें. या पलटणींतील सुमारें २५ इसमांना नोकरींतून कमी केलें. प्रयाणसमयीं कमांडर साहेबांनीं राजनिष्ठेनें वागण्याविषयीं त्या पलटणींतील लोकांना उपदेश केला.

ता. ७ फेब्रुवारी पासून जस्टिसेस हॅरिंग्टन व बुइरॉफ यांजपुढें हायकोर्टाच्या अव्वल शाखेनें दिलेल्या निकालावरचीं अपिलें सुनावणीस निघणार आहेत. या अपिलांच्या यादींत लजपतराय वि. इंग्लिशमन या खटल्यांत लालाजींच्या वतीनें ज. फ्लेचर यांनीं दिलेल्या निकालावरच्या अपिलाचा नंबर दुसरा आहे.

सीन नदीस महापूर येऊन पॅरिसमध्यें जलप्रलय होऊन गेला आहे ता. ३० पासून नदीचें पाणी उतरूं लागलें आहे. महापुरानें अनर्थ उडून गेला. हजारों इमारती जमिनदोस्त होऊन लाखों लोक निराश्रित झाले आहेत. सर्व शाळा व सार्वजनिक इमारती लोकांना रहाण्यास दिल्या आहेत. लष्करी लोकांनीं सुमारें २०-२५ हजार लोकांना आंथरुणपांघरुण पुरविलें. सुमारें २॥ लक्ष लोक घरनादार अशा स्थितींत फिरत आहेत. चोरट्यांना अशांतच फावलें आहे. त्यामुळें सर्व शहरांतून चोऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे. किंग मॅनुअल यांनीं निराश्रितांकरितां २००० पौंड पाठवून दिलें.

एक काश्मिरी गृहस्थ नबाबाचे पाहुणा ह्मणून डाक्का येथें गेले होते. त्यांनीं नबाबाच्या खुनाच्या प्रयत्नाबद्दलची हकीकत लाहोरच्या "पैसाअखबार" पत्रास लिहून पाठविली ती अशी:— एक बंगाली तरुण नबाबाच्या वाड्यांत पाहुणा ह्मणून राहिला होता, त्यानें मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली होती. वारंवार नबाबाबरोबर त्यास जेवण्याखाण्याची संधि मिळत असे, तो तेथें दोन अडीच महिने होता नेहमीं कांहीं तरी जिन्नस चोरीस जात, पण पत्ता लागत नसे. तारीख ११ जानेवारी रोजीं झालेल्या चोरींत या तरुण बंगाली इसमाविषयीं जबर संशय आल्यावरून त्यास पोलिसांच्या हवालीं केलें. तेव्हां सर्व प्रकार बाहेर पडला. तो ह्मणाला:— "कलकत्त्यास अराजकांची एक गुप्त मंडळी आहे. तिनें नबाबाचा खून करण्याचे कामावर माझी योजना केली आहे. मला या कामगिरीबद्दल ७००० रुपये देऊं केले आहेत. मशिदींत नबाब निमाज पढत असतांना दोन तीन वेळां सुरीनें त्यांचा जीव घ्यावा, अशा बेतांत होतों पण ऐन वेळीं माझें धैर्य गळून छाती खचत असे. ह्मणून माझ्या हातून खुनाचें काम झालें नाहीं."

ता. १ रोजीं सारा दिवस आरोपीची जबानीच चालली होती. मुख्य आरोपी कान्हेरे यांस आतां अत्यंत पश्चाताप होऊन मी विनाकारण चांगल्या माणसाचा खून केला असें त्यानें बोलून दाखविलें.

गेल्या मंगळवारीं हायकोर्टांत चीफ ज. सर लॉरेन्स जेन्किन्स व स्पेशल जुरी यांच्या समोर खा. ब. शमशुल—अलम याचा खून करणारा बीरेंद्रनाथ गुप्त यास चौकशीसाठीं उभें करण्यांत आलें. आरोपीतर्फे वकील मि. सेन यांनीं सांगितलें कीं, "आरोपी कांहींएक सांगत नाहीं. माझ्या वतीनें खटपट करण्याचें कारण नाहीं. मी खून केला आहे. व फांशी जाण्यास तयार आहे असें ह्मणत आहे." नंतर अॅडव्होकेट जनरल यांनीं खून कसा झाला वगैरे हकीकत सांगितली रीतीप्रमाणें साक्षीपुरावा वगैरे सर्व झाला. आरोपी बेफिकीर असून एकसारखा हंसतच होता. त्यास त्याचें काहीं एक वाटलें नाहीं. जबाब देण्याचें आरोपीनें नाकारिलें. शेवटीं कोर्टानें आरोपीस फांशीची शिक्षा दिली.

शिंद्यांच्या राजेसाहेबांनीं पुढील पत्रें संस्थानच्या हद्दींत न आणण्याविषयीं हुकूम सोडिला आहे:—अमृतबझारपत्रिका, पंजाबी प्रकाश [लाहोर] हिंदुस्थान, [लाहोर] झंगासियल आकाश [दिल्ली] वंगवासी [कलकत्ता] इत्यादि या हुकुमांत पुढील आशयाचा मजकूर आहे. ता. १५ फेब्रुवारीच्या पुढें राजद्रोही मजकुराचीं कोणतींही पत्रें अगर मासिक पुस्तकें संस्थानच्या हद्दींत कोणींही आणूं नयेत अगर त्याचा प्रसार करूं नये. या विरुद्ध वर्तन झाल्यास त्याजवर रीतीप्रमाणें खटला केला जाईल.

---

## वऱ्हाडसमाचार.

पौष वद्य १२ शके १८३१.

### सद्यःस्थिति.

—:०:+:०: —

नुकत्याच झालेल्या कौन्सिलाच्या पहिल्या बैठकींत लॉर्ड मिंटो यांनीं केलेल्या भाषणावरून आणि त्यावर अँग्लो इंडियन पत्रकारांनीं केलेल्या भाष्यावरून देशी वर्तमान पत्रांची आणखी मुस्कुटदाबी होणार हें स्पष्ट दिसत आहे. आपल्याला दडपादडपीचे अनेक उपाय मोठ्या कष्टानें योजावे लागले असें लॉर्ड मिंटो यांनींच स्वतः कबूल केलें आहे. हे दडपशाहीचे प्रकार लोकांनीं इतक्या सोशिकपणानें सहन केले आहेत कीं व्हाइसरॉय साहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें ही वर्तमानपत्रांची मुस्कुटदाबी कांहीं थोड्याशा मुदतीपुरतीच होणार असेल तर तीही सहन करण्याला लोक विशेष कुरकुरणार नाहींत. या नव्या उपायानें पुष्कळांना आपल्या तोंडाला निष्कारण खीळ घालून घ्यावी लागणार असली तरी ज्या प्रसंगामुळें असें करणें भाग पडलें आहे त्याचें महत्व लक्षांत घेतां या उपायाच्या खालीं निमुटपणें मान वाकविणें निरुपायानें कां होईना पण भाग पडेल. ज्या दिवशीं वर्तमानपत्रांना ही इषारत मिळाली त्याच्या आधल्या दिवशींच एका सरकारी कामगाराचा भयंकर रीतीनें खून झाला होता. नाशिकच्या खुनाच्या प्रकरणाचा शेवट लागण्यापूर्वींच हा भयंकर प्रकार घडून आला या मुळें राजकीय वातावरणांतील ढग एकाएकीं जमूं लागू. सर्वत्र अंधःकार झाला होता. हा अंधःकार विरून जाई तों पर्यंतच कडक उपाय अंमलांत रहातील असेंहि आश्वासन लॉर्ड मिंटो यांच्या भाषणांत आहे. सरकारच्या मार्गांत अडचणी कशा आहेत हें ध्यानांत घेऊन, प्रसंगीं ज्या बाबींसंबंधानें सरकारावर कडक टीका करणें योग्य असतें तेव्हां त्या अडचणींकडे लक्ष पुरवून तशा प्रकारची टीका सर्व समंजस देशी पत्रकर्ते करीत नसतात. चांगल्या शांत डोक्याच्या बुद्धीला देखील चांचल्य यावें अशा अगदीं गडबडीच्या प्रसंगीं कडक उपाय योजले जातात हें देशी पत्रकारांतील समंजस लेखकांच्या ध्यानांत सदैव असतें. अँग्लो इंडियन समाजांतील एका पक्षाला या सर्व प्रकरांत कशा प्रकारची भीति वाटत असते आणि त्यांचें हितानहित कशावर अवलंबून असतें हेंहि प्रसिद्धच आहे. तरी सुद्धां लॉर्ड मिंटो यांच्या कारकीर्दींत योजले गेलेले उपाय झाले त्याहून जास्त कडक व दडपशाहीचे झाले नाहींत याबद्दल समंजस पत्रकारांनीं कृतज्ञताबुद्धि प्रकट केलेली आहे. या पत्रकारांनीं अशा उपायांवर जी कांहीं टीका केलेली आहे. तिच्या मुळाशीं वस्तुस्थितीच्या भयंकरपणाच्या मानानें उपाय जास्त कडक आहे हा विश्वास होता. शिवाय दुसरें असेंहि कारण होतें कीं अशा फाजील कडक

उपायांच्या योजनेची परवानगी अदूरदर्शी अशा अधिकाऱ्यांनीं हट्टानें मागितलेली आहे हें त्या पत्रकर्त्यांस उघड दिसत होतें. या दोन कारणांमुळें कडक उपायांवर देखील समंजस पत्रकर्त्यांनीं टीका केलेली होती, पण त्या कडक उपायांखालीं डोकें नमविण्याची वेळ आली तेव्हां तें त्यांनीं निमूटपणानें केलें. कारण राज्यकर्त्यांतील कांहीं लोकांच्या फाजील कडकपणाच्या आवडीपेक्षां स्वजनांपैकीं कित्येकांच्या उपद्व्यापांचा तिटकारा त्यांना जास्त आला.

बंगाल्यांतील स्थिति पुष्कळ दिवसांपासून इतकी घोंटाळ्याची झालेली होती कीं 'बंगाली' पत्रासारख्या समंजस पत्राला देखील सरकारी उपायांमुळें गडबडून आप्पाखेरीज मार्ग उरलेला नव्हता. मग बंगाली भाषेंत निघणाऱ्या पत्रांची गोष्ट तर दूरच. बंगालची फाळणी कायम झाल्याचें जाहिर झाल्यापासून तेथील लोक सरकारला प्रतिपक्षीय समजून त्या प्रमाणें त्यांच्याशीं वागत असत. असें करण्यांत कदाचित् लोकांची थोडीशी चूक झाली असें क्षणभर मानलें तरी त्यांना त्याचप्रमाणें वागविणें तेथील सरकारला शोभत नव्हतें. लोकांची खरोखर जी तक्रार होती ती नाहींशी करण्याचे प्रयत्न झालेले नाहींत. उलट आपण जे जे उपाय योजतों त्यामुळें लोकांचा असंतोष जास्तच वाढत जात आहे हें पाहून त्यांच्या विषयीं आपलें मन कठिण करून घेणें अधिकाऱ्यांस इष्ट वाटलें. लोकांची जी जी तक्रार असेल ती वंगभंगामुळें उद्भवलेल्या असंतोषापैकींच आहे असें मानण्यांत येऊं लागलें. वंगभंग जसा बुद्धीपुरस्सरपणें अमलांत आला त्याचप्रमाणें पुढचे सर्व उपाय जाणून बुजून लोकांची खोड मोडण्यासाठीं योजले जात आहेत असेंच लोकांना वाटलें. या सर्वांचा परिणाम असा झाला कीं बेकायदेशीर रीतीनें वागणारे लोक एकदम सार्वजनिक बाबतींत पुढें झाले. हा सारा प्रकार केवळ पुंडजील आस्तेवाईक पोलिसांच्या कारवाईतूनच उत्पन्न झालेला नाहीं हें लोकांना कळून येण्यास देखील बराच अवधि लागला. अराजक व दरोडेखोर लोकांचे कट झालेले आहेत या गोष्टीवर ज्यांचा विश्वास बसत नव्हता त्यांचा संशय पोलिसच्या विरुद्ध सिद्ध झालेल्या कित्येक गोष्टींवरून बळावला. वस्तुस्थितीचा भयंकरपणा जास्त अधिकाऱ्यांनीं आपल्या पुरता फुगविलेला होता तितकाच तो लोकांनीं कमी करून ठेवलेला होता आणि त्याला कारण लोक व अधिकारी यांच्या मधील सलोख्याचें दळणवळण बंद पडलें होतें हें होय. लोक व सरकार यांच्यामध्यें अशा रीतीनें छत्तीसाचा आंकडा पडल्याचा फायदा अराजक लोकांनीं चांगलाच घेतला. एकापेक्षां एक जास्त भयंकर अशा स्वरूपाचे अत्याचार घडून आल्यामुळें आतां लोकांचे डोळे उघडले आहेत. अधिकाऱ्यांनीं फाजील उद्योगीपणा केला असें जरी त्यांना वाटत आहे तरी आपण वैराग्य धारण केल्याप्रमाणें स्वस्थ बसलों त्याचा फायदा अराजकांनीं घेतला ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येऊन चुकली आहे. ही जाणीव फार उशीरां झाली आहे यांत शंका नाहीं. कोणत्या वेळीं कोणाचा घात होईल याचा नेम उरला नाहीं. कितीही सावधगिरी ठेविली तरी घात व्हावयाचा टळत नाहीं हें बंगालच्या अनुभवास आलें आहे आणि या अराजक कृत्यांचे बेत कोणत्या ठिकाणीं कसे चालले असतील याचा सुमार लागत नाहीं हें महाराष्ट्रांतील हकीकतींवरून दिसून आलें आहे. अराजक प्रकारांच्या सुळसुळाटाची जाणीव सर्व लोकांना सारखीच झालेली आहे यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें या अमानुष्य प्रकारचा उच्छेद करण्यासाठीं जे उपाय योजणें सरकारला इष्ट वाटेल त्यांची बजावणी कबूल करण्यालाहि लोक तयार होतील हें उघड आहे. बंगाल्यांतील देशी भाषेंत निघणाऱ्या पत्रकारांनाहि चालू परिस्थितींतील भयंकरपणा उमजला असून तत्संबंधी जबाबदारी त्यांनीं ओळखली आहे असें दिसतें पत्रकर्त्यांच्याच संबंधानें पाहिलें तर त्यांच्याविषयीं ठेवावी ती दृष्टी रास्त आहे असें सिद्ध करून दाखवितां येईल. ज्या गोष्टी एका पत्रकारानें लिहिल्या असतां अनिष्ट परिणामी होण्याचा संभव असेल त्याच दुसऱ्या एखाद्यानें लिहिल्या असतां तशा होणार नाहींत. या मुळें ज्यांचा अधिकार मोठा त्यांचे वरच जास्त जबाबदारी आहे. गवताच्या गंजींत निखारे टाकणारा आणि ओल्या लांकडांच्या वखारींत विस्तव टाकणारा सारखेच दोषी असतील परंतु एखाद्या कृतीचा परिणाम जास्त त्वरित व जास्त भयंकर होण्या सारखा असल्यामुळें त्याच्या माथीं जास्त दोष मारणें अपरिहार्य होतें. परंतु अशा प्रकारचा आगीचा खेळ मराठी भाषेंतील पत्रकर्त्यांत तरी कोणी करीत आहे असें आह्मांस वाटत नाहीं हें येथें सांगणें इष्ट आहे. तें अशा साठीं कीं जरी यदा कदाचित् दुसऱ्या कोठच्या भिन्न परिस्थितीमुळें पत्रकर्त्यांची मुस्कटदाबी करणें सरकारास भाग पडलें तरी त्या उपायाचा मराठी भाषेंतील पत्रकर्त्यांवर प्रयोग करावयाचें कारण नाहीं हें अधिकाऱ्यांस वेळींच कळून ठेवणें हें आमचें कर्तव्य आहे. इतरत्र सुद्धां निजाम साहेबांनीं सुचविलेला ताकिदीचा मार्ग सर्वांत सौम्य असून कार्यसाधक होण्यासारखा आहे. लोकांवर राज्यकर्त्यांनीं भरंवसा ठेवला पाहिजे इतकेंच नव्हे तर राज्यकर्ते आपणावर भरंवसा टाकतात हें लोकांना उमजलें पाहिजे हें लक्षांत ठेवून वर्तमानपत्रांच्या मुस्कटदाबीनें उडणारी खळबळ सरकार टाळील तर फार चांगलें होईल. कौन्सिलांत सुधारणा व वर्तमानपत्रांच्या तोंडाला कुलूप या दोन गोष्टी एकमेकीला शोभणाऱ्या नाहींत. अत्याचारामुळें लोकांच्या मनाची स्वस्थता आधींच नाहींशी झालेली आहे त्यांत आणखी असल्या उपायांनीं त्यांच्या दुःखावर डागण्या बसण्याचा संभव आहे.

## वृत्तपत्राची मुस्कटदाबी.

—:०:*०:—

देशी पत्रकर्त्यांची मुस्कुटदाबी करण्याविषयीं लार्ड मिंटो यांनीं इशारत देऊन ठेवलेलीच आहे आणि एक दोन आठवड्यांतच ही इशारत मूर्त स्वरूपांत दिसून येणार आहे. या उपायाचें अवलंबन करण्याचा सरकारचा कृतनिश्चय असल्यामुळें लोकमताची पर्वा किती बाळगिली जाणार हें उघडच दिसतें आहे. सुशिक्षित समाजाला तरी निदान मुद्रण स्वातंत्र्याचा हक्क अत्यंत प्रिय वाटणारा आहे. दुसऱ्या कोणत्याही हक्का पेक्षां ते याची किंमत जास्त समजतात. हा हक्क परदेशीय खरा परंतु तो इकडे येऊन लोकांच्या हाडीमासीं खिळून गेल्यामुळें त्याविषयीं लोकांमध्यें इतकी आस्था उत्पन्न झालेली आहे कीं ती दुसऱ्या कोणत्याही संस्थेविषयीं ते इतका आदर दाखवीत नाहींत, मग ती देशी असो कीं परकीय असो. स्वतंत्र मुद्रणसंस्था जशी लोकांना तशीच सरकारालाहि उपयोगाची आहे. उपयुक्त ज्ञानाच्या प्रसाराचें तें जबरदस्त साधन आहे. तें एक प्रकारचें लोकमत निदर्शक यंत्र आहे. कोणत्याही महत्वाच्या प्रश्नाविषयीं लोकमताचें ज्ञान सरकारास होण्याचा तो सुलभ मार्ग आहे. हिंदुस्थान सारख्या देशाच्या स्थितींत तर त्याचें महत्व अत्यंत आहे. राज्यकर्ते परकीय, त्यांचें लोकांशीं संघटन नाहीं, लोकमत अधिकाऱ्याचे कानावर घालण्यास संस्था नाहींत, अशा स्थितींत वृत्तपत्रें जी कामगिरी बजावतात तिचें महत्व खरोखरच फार आहे. हैमूर सरकारनें सुचविल्याप्रमाणें त्यांच्या मानेवर अंमलबजावणी खात्याचा खडा ठेवणें ह्मणजे त्यांचें स्वातंत्र्य व त्यांची उपयुक्तता हीं दोन्ही एकदमच नाहींशी करणें होय. पत्रकर्त्यांच्या तोंडाला मुसकें बसल्यावर त्यांच्याकडून लोकांच्या अंतःकरणांतील खळबळीचें प्रतिबिंब उमटविलें जाणार नाहीं. अधिकाऱ्यांची मर्जी जेणेंकरून प्रसन्न राहील असे विचार प्रदर्शित करावेत किंवा आपला बाजारू आटोपावा या पेक्षां तिसरा मार्ग त्यांना उरणार नाहीं. अशा प्रकारचीं लोकमत प्रदर्शित न करणारीं, किंवा भीतीनें सत्याचा विपर्यास करणें ज्यांना भाग पडतें आहे अशीं वृत्तपत्रें असण्यापेक्षां मुळींच नसलेलीं बरीं नव्हेत काय? अधिकाऱ्यांचा कोरडा पाठीवर सारखा उगारलेला पाहून ज्यांना दम निघावयाचा नाहीं त्यांच्या हातून प्रामाणिकपणानें आपलें कर्तव्य कसें बजावलें जाईल? मग तीं पत्रें ह्मणजे अधिकाऱ्यांचीं मतें जाणून बुजून लोकांचीं ह्मणून लोकांवर लादणारीं हमाली पत्रकेंच होतील. ब्रिटिश अमदानींतच आह्मांला प्रथम मिळालेल्या या देणगीला लॉर्ड मिंटो यांच्या सारख्या सुधारणावादी मुत्सद्याच्याच हातून अजीबात फांटा मिळणार नाहीं अशी आशा आहे. मुद्रणस्वातंत्र्याच्या हक्काचें कोणी अतिक्रमण केलेलें नाहीं असें कोणाचेंहि ह्मणणें नाहीं. पण ती गोष्ट प्रत्येक हक्काला लागू आहे. जो कोणी त्या हक्काचा दुरुपयोग करील त्याला शासन करणें हें रास्तच आहे. असा दुरुपयोग करणारांना सध्यां कायद्यानें घालून दिलेल्या मुदतीपर्यंत शासन होतच आहे. वर्तमानपत्रांवर आतांपर्यंत राजद्रोहासंबंधाचे जे खटले झाले त्यांवरून असें दिसून आलें आहे कीं या प्रकारच्या राजद्रोहाच्या निर्मूलनाला सध्यांचा कायदा पुरेसा आहे. मग आणखी कायदा करण्याची जरूर कोणती? वर्तमानपत्रांवर नजर ठेवण्यासाठीं अधिकारी नेमण्याची कल्पना कित्येक समंजस अंग्लो इंडियन पत्रकर्त्यांना सुद्धां पसंत नाहीं. ते ह्मणतात कीं पांच वर्षांपूर्वीपेक्षां हल्लींची स्थिति सुधारलेली आहे असें लॉर्ड मिंटो यांचें ह्मणणें आहे तर वर्तमानपत्रांवर संक्रांत कां? अराजक चळवळींचा देशी पत्रांशीं संबंध आहे असें वारंवार सुचविण्यांत येत असतें. असे उद्योग करण्यास चिथावणारीं पत्रें फार दिवसांपूर्वीं निघत होती आणि त्यांचा घातक उद्योग चालू असतांना पोलिस स्वस्थ झोंप घेत होतें ही गोष्ट खरी आहे. तथापि त्यांची इतीश्री झाली असून त्यांचा पुनर्जन्म होण्याचा कोठेंहि संभव उरलेला नाहीं. लेखकांच्या अंगचीं जबाबदारीची वाण जेथें फक्त आवेशानें किंवा स्वैर शब्दप्राचुर्यानें भरून निघत आहे असें जेव्हां जेव्हां दिसून आलें तेव्हां तेव्हां राजद्रोहावरून खटल्याची तयारी लागलीच झालेली दिसून आली आहे. या मध्यंतरींच्या मुदतींत राजद्रोहाच्या खटल्यांनीं वृत्तपत्रकर्त्यांचीं हाडें इतकीं खिळखिळीं झालेलीं आहेत कीं आतां पुनः नुसत्या बेजबाबदारीच्या बाबतींत सुद्धां पूर्व स्थितीला येण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं उरलेलें नाहीं मग सरकारविषयीं जाणून बुजून असंतोष पसरविण्याची गोष्ट लांबच राहिली. पंजाब व वायव्य प्रांतांतील वर्तमानपत्रांवरील खटले वास्तवीक या मालिकेंतील शेवटचे होय. त्यांतहि पत्रकर्त्यांच्या अंगीं कोणत्याहि एका बाजूनें पक्केपणा दिसून येत नसून केवळ बेजबाबदारीच्या मूर्खपणाचे हे सर्व परिणाम आहेत असें दिसून येत आहे. खटल्यांची रांग ज्या वेगानें लागली त्याच वेगानें माफ्यांची रांगाहि सुरू झालेली आहे, ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. जेथें प्रत्यक्ष लेखकाच्या डोक्यांतच ठाम झालेले विचार नाहींत तेथें त्याच्या भाषेचा परिणाम वाचकावर काय होणार तें दिसतेंच आहे. कलकत्त्याच्या खुनांतील आरोपीची जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे तीवरून तो अशा तत्वशून्य लेखांच्या वाचनानें आपला प्राण खर्ची घालण्यास तयार झाला असेल असें वाटत नाहीं. जे लेख एकदां सुद्धां पुरते वाचकाला नजरेखालून घालवावे असें वाटणार नाहीं त्या लेखांमुळें मनुष्य आपल्या जिवावर उदार होईल ही कल्पनाच वेडगळपणाची आहे. अराजक विचारांचा प्रसार होण्याचें साधन वर्तमानपत्रें हें तर खात्रीनें नाहीं. तें साधन निराळेंच आहे आणि त्याचा वास लॉर्ड मिंटो यांना आलेला आहे. गुप्तपणें चाललेल्या उद्योगांतच हें साधन दिसून येणार आहे. त्याचा पत्रांशीं संबंध नाहीं, लेखांशीं नाहीं, मनाशीं मन आणि विचाराशीं विचार जेथें जुळेल तेथेंच अराजक उद्योगांची तयारी होणें शक्य आहे. ही तयारी अगाऊच ढासळविण्याचे मार्ग दुसरे कोणतेही असोत, वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी हा तो मार्ग नव्हे येवढें आह्मी सरकारास कळविण्याची परवानगी घेतों.

## मॉस्लेम लीगची बैठक

—*:*:—:*:—

दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत ऑल इंडिया मॉस्लेम लीगची बैठक अर्काटचे नबाबसाहेबांच्या अध्यक्षत्वाखालीं झाली. या प्रसंगीं लीगचे लंडन शाखेचे अध्यक्ष नेक नामदार सय्यद अमीर अली यांनीं लिहून पाठविलेलें भाषण वाचण्यांत आलें. ना. अगाखान यांनीं ही एक भाषण केलें.

मुसलमानांना कायदे कौन्सिलांतील जागा मिळवून देण्याच्या बाबतींत फाजील मेहेरबानी दाखविली गेली, त्या मुळें हिंदुमुसलमान सभासदांत व समाजात जी एक प्रकारची तेढ उत्पन्न झाली आहे ती कशी नाहींशी करावयाचा मार्ग ना. अगाखान यांनीं आपल्या भाषणांत दाखवून दिला आहे. ते ह्मणाले आपण हिंदी समाजाचे प्रतिनिधि आहोंत हें लक्षांत घेऊन मुसलमान सभासदांनीं इतर हिंदी सभासदांच्या बरोबर राष्ट्रहितासाठीं खपलें पाहिजे. शिक्षणाचा प्रसार, प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करणें, व्यापारउदीमांची अभिवृद्धि, परस्पर सहाय्यकारी पतपेढ्यादिकांच्या सहायानें शेतीची सुधारणा आणि देशांतील एकंदर द्रव्योत्पादनाचीं साधनें वाढविणें हीं कामें बरोबरीनें झटून केलीं पाहिजेत. इतकें सर्व योग्यच झालें परंतु राजकीय स्वरूपाच्या अनेक कार्यांत सध्यां या दोन समाजांच्या सहकारित्वाची फारच 'अवश्यकता आहे त्यांचा निर्देश मात्र नामदारानीं टाळला आहे. मुसलमान समाजांतील पुढाऱ्यांचीं कर्तव्यें आणि सरकारच्या योजनांविषयीं ठेवावयाचें धोरण या विषयीं नामदार अगाखान यांनीं इतकें तरी बोलण्यास सुरवात केली हें सुद्धां पुष्कळ झालें. ब्रिटिशसत्ता हिंदुस्थानांत स्थिर असावी हें मुसलमानांप्रमाणें हिंदूंनाहि वाटत आहे, त्याचप्रमाणें कायद्यांचा मान राहून देशांत शांतता नांदावी ह्मणून सरकारी अधिकाऱ्यांना मदत करण्यास मुसलमानांच्या प्रमाणें हिंदूही तयार आहेत ही गोष्ट सय्यद अमीरअलीसाहेबांच्या ध्यानांतच राहिली नव्हती असें वाटतें. मुसलमान समाजांतील या दोन पुढाऱ्यांनीं आपल्या बांधवांस सरकारशीं ठेवावयाच्या वर्तणुकीविषयीं जो बाणेदारपणाचा उपदेश केला आहे तो ग्रहण केला जाईल अशी आशा आहे. कायदे कौन्सिलांत व लोकल बोर्डें इत्यादि स्थानिक संस्थांत अधिकाऱ्यांचें तोंडी लावणें होण्याऐवजीं या पुढाऱ्यांचा उपदेश मुसलमान बंधु लक्षांत वागवितील तर त्यांत त्यांचें हितच आहे. पुढील सालीं नागपूर येथें लीगचीं बैठक होण्याचें ठरलें आहे.

## नवें पार्लमेंट व हिंदुस्थान.

—:*:-:*:—-

जुनें हाउस ऑफ कॉमन्स गेल्या महिन्यांत बरखास्त झाल्यावर निवडून आलेलें नवें हाउस ऑफ कॉमन्स येत्या एकविसाव्या तारखेस सुरूं होईल. गेल्या पार्लमेंटाबरोबरच लिबरल पक्षाचाहि अस्त होईल अशी भीती मध्यंतरी वाटूं लागली होती. परंतु तसें न होतां तो पक्ष पुनः अधिकारारूढ होण्याची खात्री आतां आलेली आहे. या नव्या पार्लमेंटांत हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीचें पद लॉर्ड मोर्ले यांच्या कडेच कायम रहाणार आहे ही गोष्ट आमच्या दृष्टीनें विशेष महत्वाची आहे. लॉर्ड मोर्ले यांनीं पार्लमेंटमध्यें जो नेट दाखविला तो दाखविला नसता तर अगोदरच दिरंगाईवर पडलेल्या राज्यकारभारांतील सुधारणा आणखी लांबणीवर पडल्या असत्या. लॉर्ड मोर्ले यांचे स्वतःचे उच्च विचार, आचारविचारांतील निर्दोषता आणि अनुभवानें व ज्ञानानें प्राप्त झालेला अधिकार यां पुढें प्रतिपक्षीयांचे सर्व डावपेंच फिके पडले. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं इंग्लंडांतील मुख्य विरोधी पक्षांपैकीं लिबरल पक्षच हिंदुस्थानच्या कल्याणाला अनुकूल आहे हें सिद्ध झालें आहे. हिंदुस्थानची राजकीय बाबतींत हळूहळू प्रगति करण्याचा जो मार्ग लॉर्ड मोर्ले यांनीं स्वीकारला आहे त्यालाच ते चिकटून राहून मध्यंतरी उपस्थित होणाऱ्या आगंतुक अडचणींमुळें तो सोडून देणार नाहींत अशी आशा बाळगण्यास हरकत दिसत नाहीं. लिबरल मताधिक्याचें हाउस ऑफ कॉमन्स आणि लिबरल स्टेट सेक्रेटरी असल्यावर सुधारणा चालूं असावयास अडचण पडणार नाहीं. कायदे कौन्सिलविषयींच्या नियमांतील दोष थोड्याच अवकाशांत अधिकारी वर्गाच्या अनुभवास निःसंशय येतील. आणि तसें झालें ह्मणजे त्यांत दुरुस्ती करण्यास लॉर्ड मोर्ले उशीर लावणार नाहींत अशी आशा आहे दुसऱ्या एका बाबतींत लॉर्ड मोर्ले यांनीं सुधारणा करण्याचें योजलें आहे. डीसेंट्रलायझेशन कमिशननें केलेल्या सूचना प्रसिद्ध झालेल्या आहेत. सध्यां या सूचनाचा विचार चालूं आहे. जर कदाचित् कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षाची सरशी झाली असती तर या सूचना कांहीं तरी सबबीवरून एका बाजूस पडल्या असत्या. परंतु निवडणुकीचा निकाल आतां लागला असल्यामुळें लवकरच या संबंधांत काय तजविजी होतात तें ऐकूं येईल नव्या पार्लमेंटमध्यें नुसते स्टेट सेक्रेटरीच एकटे हिंदुस्थानच्या हिताला जपणारे आहेत असें नाहीं. हाउस ऑफ कॉमन्समधील लिबरल पक्षांत अनुभवीक असे बरेचसे गृहस्थ अशा रीतीनें उपयुक्त होण्यासारखे आहेत. मजूरपक्षाचा ओढा बहुधा हिंदुस्थानाकडे रहाण्याचा संभव आहे. हिंदुस्थानविषयीं कळकळ बाळगून नुकतेच स्वतः येथील स्थिति अवलोकन करून गेलेले मि. रामसे मॅक्डोनल्ड हे हाउस आफ कामन्समधील एक वजनदार सभासद असून उभयपक्षां त्यांच्याविषयीं आदर आहे. त्यांच्या जोडीला मि. केर हार्डी, मि. लीसस्मिथ आणि सर चार्लस डिल्क यांच्यासारखी प्रगल्भ विचाराची व विकसित मनाची मुत्सद्दीमंडळी आहेत. शिवाय हिंदुस्थानासंबंधानें आजपर्यंत तटस्थ रहाणाऱ्या कित्येक गोऱ्या मुत्सद्यांचें लक्ष लॉर्ड कर्झन यांनीं खाजवून खरुज काढून घेतल्यामुळें हिंदुस्थानाकडे वेधलें आहे.

## ना. अमीर अली यांस खाना.

—:∘+∘:—

नेक नामदार सय्यद अमीर अली यांना प्रिव्ही कौन्सिलांत नेमल्याबद्दल लंडन येथील हिंदुस्थानच्या वतीच्या बड्या मंडळींनीं त्यांना नुकतीच एक मेजवानी दिली. या प्रसंगीं लार्ड रे हे सय्यद साहेबांचें अभिनंदन करतांना ह्मणाले, हिंदु व मुसलमान यांच्यांत ऐक्यभाव वृद्धिंगत करण्याचें धोरण सरकारनें नेहमीं राखलें पाहिजे. हिंदू व मुसलमान यांच्यांत सदैव निःपक्षपातीपणा राखावा, असेंच मि अमीरअली यांचें धोरण असावें असें मला वाटतें. या वाक्यांतील खोंचीला सय्यद साहेबांनीं उत्तर दिलेलें नाहीं तथापि त्यांनीं बरेंच पोक्तपणाचें भाषण केलें. या भाषणांत हिंदुमुसलमान हा भेद बाजूस ठेवून हिंदुस्थानच्या वतीनें ते बोलत होते. ते ह्मणाले, माझी प्रिव्ही कौन्सिलमध्यें नेमणूक करून सरकारनें माझा स्वताचा गौरव केला असें मी समजत नाहीं. तर या नेमणुकीनें सर्व हिंदी लोकांचा गौरव व सन्मान झाला असें मी समजतों. न्यायीपणा हाच ब्रिटिश सत्तेचा मुख्य आधारस्तंभ होय शासन पद्धतीचा पूर्ण विकास होण्यास तीन उत्तमोत्तम देशी लोकांना पूर्ण वांटा मिळाला पाहिजे हें जरी अगदीं खरें आहे तरी त्यांतून ब्रिटिशतत्व नाहींसें होतां कामा नये ब्रिटिश लोकांचें राज्यकारभारांतून अंग नाहींसें होईल तर हिंदुस्थानात सर्वत्र बेबंदशाई सुरूं होईल असें जरी आहे तरी इंग्लिशांनीं एक गोष्ट सदैव लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, आपल्या प्राचीन संस्कृतिबद्दल अत्यंत अभिमान असणाऱ्या समंजस पण नाजूक मनोवृत्तींच्या लोकांवर आपण राज्य करीत आहों. सय्यद साहेबांनीं राज्यकर्त्यांच्या वर्गाला उद्देशून केलेली ही सूचना व त्यांनीं वस्तुस्थितीचें केलेलें वर्णन अगदीं यथार्थ आहे. हिंदुस्थान आपण तरवारीच्या जोरावर राखलें आहे असें ह्मणून लंडन टाइम्सादिक आपली फसवणूक करून घेतात, परंतु हिंदुस्थानच्या लोकांचा ब्रिटिश न्यायावर विश्वास आहे ह्मणूनच हें राज्य चालूं आहे हें सय्यद साहेबांचें ह्मणणें सत्य आहे.

## धूमकेतु

हल्लीं सायंकाळीं धूमकेतूची तारा व शिखा दिसत नाहीं तथापि त्याच्या शेंपटीची आकृती प्रवाही पदार्था प्रमाणें लांबवर शनि व मंगळ यांच्या पर्यंत पसरलेली चांगली दृष्टीस पडते. इंग्रजी ग्रंथांतून आपण धूमकेतू विषयीं पुष्कळ माहिती वाचतां तशी माहिती आमच्या कडील प्रसिद्ध अधुनिक ज्योतिर्विद् क. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचे चिरंजीव रा. रा. कृष्णाजी पंत असि० शिक्षक, हायस्कूल सातारा यांनीं गेल्या १९०९ च्या प्रारंभीं एका सुंदरशा सचित्र पुस्तकांत ग्रथित केली आहे. हें पुस्तक 'आर्यभूषण' प्रेसच्या म्यानेजराकडून नुकतेंच आह्माकडे आलें आहे. त्या वरून राजश्री कृष्णराव दीक्षित यांनीं आपला ज्योतिषाचा अभ्यास विशेष जागृत ठेविला आहे आणि त्यांच्या तीर्थरूपांचे महाराष्ट्रावर जे उपकार आहेत त्याचें स्मरण त्यांनीं आपल्या नवीन चिमुकल्या ग्रंथानें पुनः दिलें आहे. सर्वच निबंध अशा सोप्या वर्णनानें भरला आहे कीं तो मराठी भाषा जाणणाऱ्यांनीं अवश्य वाचून त्याचा आल्हाद घ्यावा असें आह्मी इच्छितों. अशा उच्च प्रतीचे निबंध लिहिणारे थोडेच ग्रंथकार सांपडतील आणि आह्मास हेंच नवल वाटतें कीं त्यांनीं एक वर्षभरापूर्वीं मनांत आणलेल्या अशाच अन्य विषया वरील त्यांचे लेख अद्याप प्रसिद्ध नाहींत. शाळाखात्याकडून अशा शास्त्रीय ग्रंथाला अवश्य आश्रय मिळावा असें आमचें आग्रहपूर्वक ह्मणणें आहे.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—थंडीचें मान साधारण आहे पण वारा अधिक जोराचा असून विशेष झोंबणारा आहे. सार्वजनिक आरोग्य प्लेगामुळें फारच असमाधानकारक आहे. आकोल्यास प्लेगाचें फाजील पुढें दररोजचें मृत्यूंचें प्रमाण १० पासून १५ पर्यंत आलें आहे. आकोट तालुक्यांत प्लेगाचा प्रसार वाढत चालला आहे.

स्थानत्याग—सध्यां ऋतुमानाप्रमाणें स्थानत्यागाचा उपाय अमलांत आणणें फारसें कठीण जात नाहीं आणि बहुतेक ठिकाणची वस्ती रानोमाळ पसरली आहे. तथापि जे लोक अद्याप गांवाला चिटकून राहतात त्यास उपदेशाच्या द्वारें युक्तीनें बाहेर काढण्याचें कर्तव्य बजावण्याला पुष्कळ स्थळ आहे.

रा. रा. निझामुद्दीन अहमद डिपुटी इन्स्पेक्टर वऱ्हाड यास नर्मदा विभागाचे आफि. इन्स्पेक्टर नेमण्यांत आलें.

रा. रा. नीळकंठ गोविंद देशपांडे तहशीलदार, केळापूर यांस तीन महिन्यांची रजा मिळणार असल्यामुळें रा. रा. पांडूरंग वासुदेव भगत यांस मलकापूराहून केळापूरास बदलून खामगांवचे तहशीलदार रा. रा. शेख मुनीर यांस मलकापूरास व रा. रा. दाराबशा एदुलजी संजाना यांस खामगांवास बदलण्यांत आलें.

वऱ्हाड हा ब्रिटिश मुलूख नसल्या मुळें मध्यप्रांत किंवा मुंबई इलाख्यांत चोऱ्या केलेले गुन्हेगार इकडे तोच अपराध करितात तेव्हां त्यांचे जुने अपराध लक्ष्यांत घेऊन जबर शिक्षा देतां येत नाहीं. ही कायद्यांतील गोम दूर करण्यासाठीं नवें बिल व्हाइसरायांच्या कायदे-कौंसिलांत आलेलें आहे तें पसार होईल तेव्हां ब्रिटिश अमलांतील गुन्हेगार आपलें जुनें कर्म वऱ्हाडांतही बरोबर आणूं लागतील, व त्यांस योग्य शिक्षाही होऊं लागतील.

वऱ्हाड महम्मदी शिक्षण परिषद् आकोल्यास प्लेग मुळें न भरवितां उमरावतीस इस्टरच्या सुट्टींत भरविण्याचा संकल्प ठरला आहे.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९॥- |
| मुंबई ब्यांकेचा सोन्याचा चालू दर तोळ्यास | | २४॥८३ |
| चांदी | | ६३॥ |
| जवस | | १३९ |
| जवारी नवी | ५३ | ६९ |
| गहूं काठे | | १२५ |
| गहूं खांडवा पीवळा | | १४० |
| गहूं बनशी | | १३९ |
| चणे | ४ | ४॥ |
| तुरी | | ३। |
| उडीद | | ४॥ |
| मुंग | | ४ |
| टोळी मोहाचे बीज | | १६ |
| तेल | | ६।- |
| सरकी | | ११ |
| तुप | | ११ |
| कापूस | ६० | ६१ |
| रुई आकोला जीन | | ८० |

## स्वस्तबसूं नका, हंगाम जवळ आला.



दिवाळी व तुळशीच्या लग्नाचे दिवस ह्मणजे ऐन हुरड्याचे दिवस होत. ह्या नंतर पंधरा वीस दिवसांनीं जोंधळा कापतात व लगेच जमीन नांगरण्याच्या हंगामास सुरवात होते. जमीन नांगरण्यास लांकडी नांगरापेक्षां लोखंडी नांगराचाच जास्त उपयोग होतो, हें तुह्मांस माहीत झालें आहे. व हजारों लोकांनीं आमच्या लोखंडी नांगरा पासून आपला फायदा करून घेतला आहे ह्मणून तुमचाही झालाच पाहिजे. तर आतां दिवसगत न करितां हंगाम जवळ आला हें लक्षांत आणून लोखंडी नांगराची त्वरित मागणी करा. ह्मणजे तुमचाच फायदा खात्रीनें होईल.

किर्लोस्कर बंधु, बेळगांव.

नो. नं. झ ६७


---


## शिवाजी छापाच्या पुतळ्या.



वज्रटीक, फिरकीचीं फुलें, बुगड्या, चांदीचे तोडे, मासोळ्या, शर्टचीं बटनें, लहान मोठीं भांडीं व मूर्ती सर्व प्रकारचे दागीने मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

**कमिशन घेऊन पाठविण्याचा माल—**

नाशिकचा हरएक प्रकारचा माल चौथाई रक्कम आल्यास व्ही. पी. नें पाठवूं.

**केशव भाऊशेट सोनार कमेटी शेजारी दुकान नाशिक.**

नो. नं. छ. ३


---


सत्रा वर्षापासून परीक्षित व सरकाराकडून रजिष्टर केलेला.

## सुधासिन्धु

कालरा, ( पटकी ) दमा, खोकला, कफ पोटशूल, अतिसार, संग्रहणी, जुलाब, अतिनिद्रा वातजन्यरोग, व मुलांचे रोग या सर्वांवर एकच स्वादिष्ट व रामबाण औषध. प्रत्येक शिशीची किंमत ।।. एका डझनास रुपये ५ टपाल हांशील १ पासून ४ पर्यंत ८= आणे व डझनास ।. आणे. एकदम ६ घेणारास १ फुकट पूर्ण माहिती व सरटिफिकीट पाहण्याकारितां क्याटलाग फुकट पाठवूं. प्रत्येक ठिकाणीं एजंट पाहिजेत, नियम मागवून पहा.

मिळण्याचा पत्ता-

**सुख संचारक कंपनी,**

**नो. नं. घ. ९३ मथुरा.**


---

## नोटीस

नोटीस बेशमी— गणपत उदाजी कोंडे जात कुणबी राहणार कसबे खेड पो० खेड जि० उमरावती यांस:--

खाली सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझा नवरा मयत झाला सबब माझे नवऱ्याचे मालकीचे शेताचा वारसा माझे नांवानें होण्याकारितां मीं तुह्मास मुखत्यारपत्र देऊन तुमचे खटपटीबद्दल पांच रुपये देण्याचें कबूल केलें होतें. त्यावरून माझे नांवानें शेत होऊन मीं तुह्मांस पांच रुपये दिले. आतां तुमचा माझा कोणतेच प्रकारें संबंध राहिला नाहीं परंतु हल्लीं तुह्मी माझे घरीं येऊन मला धमकी देतां कीं मी तुझें शेत तुझ्या नांवानीं करून दिलें. याजबद्दल मीं तुझे जवळून एक वर्ष शेत वहितीस करून त्यांतील पीक फुकट घ्यावें, अगर एक शेत वहितीस न दिलें तर दुसरा लेख १०० शंभर रुपयांची तुझे हातची माझे जवळ प्रामेसरी नोट आहे. करितां शंभर रुपये मी मागेन त्या वेळीं तुला देणें भाग आहे. अशा प्रकारें मला तुह्मी धमकी देत असतां या वरून तुह्मास कळविण्यांत येते कीं मीं तुह्मास मुखत्यारपत्र व विद्यमान तहशिल्दार साहेब ता० मोर्शी यांचेकडे शेत नांवें होण्याबद्दल अर्ज या दोन कामाशिवाय तुमचे जवळ मीं कोणत्याच कामाबद्दल लेख करून दिला नाहीं. मला स्वतः लिहितां वाचतां मुळींच येत नाहीं. या वरून मी अबला बायको स्वभाव असल्यामुळें माझे पश्चात आपण खोटा लेख लिहून घेतला असेल तो रद्द समजावा. करितां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत जो कांहीं लेख लिहून घेतला असेल तो रद्द करावा व धमकी देणें सोडून द्यावें. अगर नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे पुढें कांहीं खोटा लेख काढल्यास तो रद्द समजला जाईल. व खोटा लेख लिहिल्याबद्दल रीती प्रमाणें कोर्टांत फिर्याद केली जाईल व कोर्ट खर्च तुह्मावर बसेल व खोटा लेख लिहिल्याबद्दल शिक्षेस पात्र व्हावें लागेल. कळावें. ता० २३।१।१९१० इ०

सही

मोशी मर्द चंद्रभान फुलमाळी मु० पो० खेड ता० मोर्शी जि० उमरावती नि. खु. बांगडी.

दस्तुर मुकनमल खेड.

नो. नं. ट ९३

---

## नोटीस

रा० रामजीदास विलासराय मारवाडी दुकान ताजनापेठ आकोला काळी बाजाराचे कोपऱ्याजवळ गुरुप्रताप मारवाडी याचे दुकानांत

यांसः—

नोटीस देणार पुरणगीर गुरु विठ्ठलगीर गोसावी रा. व्याळे ता. बाळापूर नोटीस देण्यांत येतें कीं मजपासून तुह्मी सुमारें २-३ महिने होत आले. माझा साहू दाजी गंगाराम कहाते रा. व्याळे यांचे मजला स्थावर गहाणावरून १४०० चौदाशें रुपये देणें आहेत. तें रुपये तुह्मी डुबविण्याची धाक मजला देऊन त्याजबद्दल रुपये ६०० सहाशांचें, मजला तुह्मी रुपये रोख न देतां मजपासून गहाणखत नगदी भरण्याचें तुह्मी करून घेतलें. तें गहाणखत मजला कबूल नाहीं. करितां रजिष्टर करून दिलें नाहीं. व त्याच वेळीं व त्या नंतर सदर्हू मजपासून करून घेतलेला दस्तऐवज ( गहाणखत ) मजला परत देण्यासाठीं मीं तुह्मांस बरेच वेळां ह्मटलें असतां परत देत नाहीं. करितां नोटिशीनें कळवितों कीं नोटीस पावल्या दिवसा पासून ८ आठ दिवसांचे आंत सदर्हू दस्तऐवज माझा मला परत द्यावा. न दिल्यास त्याजबद्दल मी कोणत्याही प्रकारचा जबाबदार नाहीं. व फिर्याद केल्यास चालणार नाहीं. व खर्च वगैरे देणार नाहीं. उलट माझा खर्च होईल तो तुमचे पासून सर्व भरून घेईन. व माझे इनामाचें सर्टिफिकीट व कर्जरोखे, पट्टे, कुळपावती वगैरे जे जे कागद तुमचे जवळ आहेत ते सर्व तुह्मी मजला द्यावे. न दिल्यास त्याज बद्दलही तुह्मांस जबाबदार धरिलें जाईल व नुकसान झाल्यास तें तुमचे पासून भरून घेण्यांत येईल. काय तो वरील मुदतींत आपसांत निकाल करावा. कळावें ता. २६-१-१९१० इ.

सही

पुरणगीर गुरु विठ्ठलगीर गोसावी

द. खुद:

नो. नं. ट ९४

---

## नोटीस

रा. ( १ ) मारुती वल्लद हिरुजी देशमुख.
( २ ) तानकु वल्लद जानजी देशमुख.
( ३ ) रावजी वल्लद परशराम पाटील.
( ४ ) आकाजी वल्लद चंद्रभान पाटील.
आणि ( ५ ) शिवराम वल्लद जैराम देशमुख
सर्व राहणार व्याळें ता. बाळापूर यांस:—

नोटीस देणार पुरणगीर गुरु विठ्ठलगीर गोसावी रा० व्याळें ता० बाळापूर याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तह्मी माझ्याबद्दल माझा साहूकार दाजी गंगाराम कहाते रा. व्याळें ता. बाळापूर यांस माझे विरुद्ध मला न विचारतां सदर्हू साहूचा व माझा बेबनाव होण्याकारितां नोटीस दिलेली आहे. या करितां तुह्मांस कळवितों कीं सदर्हू दाजी गंगाराम हे व तुह्मी असे कोणीच माझ्या संबंधांत पंच मुळींच नाहींत व त्यांनीं माझें पालन वगैरे केलेलें नाहीं. माझें पालन माझे चुलत्यानें केलें असून इस्टेटीची व्यवस्था त्यानेंच पाहिली आहे. व जी इस्टेट दाजी गंगाराम याजपाशीं गहाण मीं लिहून दिली आहे ती मजला कबूल असून देणें सर्व कबूल आहे. माझे संबंधीं तुह्मांस कोणत्याहि प्रकारें हक्क नसतां साहूचें व माझें वांकडें पडून परिणाम चांगला होऊं नये. व माझें नुकसान व्हावें या हेतूनें तुह्मी त्यास नोटीस दिली हें चांगलें केलें नाहीं. तुह्मी त्यास नोटीस कोणाचे परवानगीनें व सांगण्यावरून दिली याचा तुह्मी जबाब द्यावा. तुह्मी माझे बद्दल मुळींच कोणत्याहि संबंधांत हात घालूं नये. जर तुह्मी विनाकारण अशीं कामें कराल तर त्याचा जबाब तुह्मांस द्यावा लागेल व साहुनें तुमचेवर इजतीबद्दल दावा केल्यास त्याची जबाबदारी तुमचेवर आहे. मी जबाबदार नाहीं. कळवें ता. २६-१-१९१० इ.

सही

पुरणगीर गुरु विठ्ठलगीर गोसावी

द. खुद.

नो. नं. ट. ९५

---

## नोटीस

नोटीस बेशमी राहिमानबेग वल्लद मिरजा अब्बासबेग व मिरजा अब्बासबेग इनामदार वस्ती आकोलें शहर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आह्मी तुह्मांस आमचे तर्फे काम चालविण्यास अजमासें ५।७ वर्षांपासून मुखत्यार नेमिलें होतें, परंतु आपण आजपर्यंत आमचें कांहींच काम जहागीरी संबंधा केलें नाहीं. करितां तुह्मांस दिलेलें मुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केलें आहे कळावें ता० १।२।१९१० इ.

सही उर्दूंत

मीर खैरात अली वल्लद मीर अमजत अली जहागिरदार

बर्मी ब्या द० खु०

नो. नं. ट ९६

---

## जाहिर नोटीस.

खालीं सही करणार याजकडून गंगी मर्द बाबुसींग रजपुत राहणार मुंडगांव ता० आकोट जि० आकोला इस:—

ईस नोटीस देणार किसनसींग वल्लद नथुसींग रजपुत राहणार मुंडगांव ता० आकोट जि० आकोला याजकडून. नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझ्या भावाची लग्नाची बायको असून तो मयत होण्यास आज सरासरी ४ महिने झाले आहेत तो जिवंत होता तेव्हां आपण सर्व एकत्र रहात होतों त्याची व आमची वडीलोपार्जित जिनगी आहे त्या जिनगीची वांटणी वगैरे झाली नाहीं. माझे भावाचे पश्चात तूं दुसऱ्याचे फंदानें वेगळी निघाली आहेस व जिनगीची अफरातफर करण्याचा तुझा विचार तूं आह्मास दिलेल्या नोटीसीवरून दिसतो तरी तुझा जिनगीवर कोणतेच प्रकारचा हक्क नाहीं. तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस तर तूं दुसऱ्याचे फंदानें न वागता रहावें. जर दुसऱ्याचे फंदानें राहशील तर तुला अन्नवस्त्र आह्मी देणार नाहीं. तूं जिनगी कोणास गहाण खरेदीपत्रानें, अगर कोणतेच तऱ्हेनें देऊं नये. दिल्यास तें रद्द असे. हिला कोणीही कर्ज वगैरे देऊं नये. दिल्यास त्याची जबाबदारी आमचे जिनगीवर राहणार नाहीं. ज्याचा तो जबाबदार राहील ह्मणून सर्व लोकांस कळावें ता० ३।२।१९१० इ.

सही

किसनसींग वा। नथुसींग रजपुत मार्फत बिसनसींग वा. किससींग द० खु०

नो. नं. ट ९७

## आर्यवनौषधालय मुर्डी

हाईनेस च. हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांचेकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमची औषधे बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतुन ज्या काहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत यापेक्षा आमचीं औषधे त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकट आह्मास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादे औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजीवनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,

रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक

मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शारीरिक मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असल तर शरिर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते ती दोषी असेल तर शरीरांत नाना कारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होउन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्याप या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसात एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनाने नपुसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार संकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय आग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुलाची खर, जिर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. वाकतरोग, धूपहे जुनाट परमा, मुष्ठमैथुनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबुत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचू लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकेट मिळाली आहेत अजि मिळतात. पथ्य सेवनाचे मुळीच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें यास पाहिजे त्या दिवसांत सेवनास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्ड्या सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दरः—एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११५ गो ३ रु १९५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें जाळें, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होउन दृष्टी तीव्र व चकचकीत राहते. या रोगांस अंजन खरे रामबाण आहे. १॥ तोळयाच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व उष्णता दाह लिंगाची मुत्राची लाली, संकोच पुयस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० किं० १ १। मार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक पूडः—दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे.

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें मुळीं ३ तो. ८ आणे.

६ गजकर्णः—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार २ दिवसांत जातात ह. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेताच कशाही प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस लेप, घात घडू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागव तो फुकट पाठवूं आपधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रथोक्त रसायने भस्म धाक. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्ड्या सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं प्रकृतिचें मान कळविल्यास रोगाचा निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक आपला समाज निरुद्योगी आळशी बनल्यामुळें एकादा जो धंदा सुरू केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ० प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजर्लें वगैरे गावांतून तो पुणावर्सेत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक यांची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस मुद्दाम विनंती हेच कीं ज्यांच्या कारखाना आज सतत १६।२० वर्षे अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधा थोरले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कित्येक वर्षी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्याचे आमचीच औषध अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावा, एकवार अनुभवानें खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकूण व त्वरित आरोग्य येईल- नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

ORIENTAL GOVERNMENT

## LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

**FUNDS EXCEED THREE CRORES**

**AND**

**THIRTY LAKHS**

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

there be one thing of more importance in Life Assura claims arise, that the amount due under the Policy are paid to the e iest possible date. This the Directors of the Oriental' ke p are up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

It s not sufficient to read that a Comp y's funds amoun m k how such in miscellaneous inves s red

The Funds of the Orient ' are invested in Government and lodged with the vnt Official Trustee of Bombay in o Company' Security fo arising through decease of ss es. endowment polici esmatured.

Government Officer, Professional men, Tradesmen and others employing of their annual income or profits in effecting life polici ere fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may have money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety o the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agent wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses forms, and any further information can be obtained

M. DESOUZA,

CHIEF AGENT.

Nagpur.

---

हें पत्र आकोलें येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४४ ] आकोला, वऱ्हाडसमाचार सोमवार तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १९१० इसवी. [ अंक ७



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवी ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
ईंग्रेजीच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.


## जाहिरात

मुंबई व्यांकेची सेव्हिंग व्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकी एकास अथवा ज्यास्त इसमांस अगर त्यांपैकी मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. त्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमाच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई व्यांक G. A. Phillips.
आकोला ९।१०।०९ एजंट
नं ७३

## नोटीस

तानी जवजे माणकू गुजराथी रा० उगवे इसः—

रामचंद्र देवचंद गुजराथी रा० उगवे कळवितों कीं तूं माझी जेष्ठ वैनी असून माझा बंधू मरण्यास अजमें ८।१० वर्षें झाली. त्या नंतर तूं व मी एकत्र राहत आहों. आज दोन वर्षांपासून तूं आमच्या बांधलेल्या घरांत निराळा स्वयंपाक करून खातेस. तुला मी खाण्यापिण्यास व कपड्यालत्त्यास पुरवितों असें असून तूं ४।५ जणांच्या नादानें अट्टाहट्टा करतेस व माझी मालमत्ता विकण्याच्या विचारांत आहेस असें ऐकतों. तरी तुला असें मुळीच करण्याचा हक्क नाहीं तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस. तूं आपल्या ताब्यांतील स्थावर जंगम माल विकल्यास त्याची जबाबदारी तुझ्यावर राहील कळावें ता. ११-२ १९१०

सही

रामचंद्र देवचंद द० खु०

नो. नं. ट ६७

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळवितों कीं माझी जेष्ठ भावजई तानी जवजे माणकू हा १।२ जणांच्या दुष्ट बुद्धीनें माझी स्थावर जंगम इस्टेट विकण्याच्या विचारांत आहेसें ऐकतों तिला मी खाण्यापिण्यास वगैरे लेण्यास देतों ती फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहे. तिजकडून माझ्या सल्ल्याशिवाय कांहीं मालमत्ता गहाण, खरेदी, वगैरे घेतल्यास ... बात असे. त्याचे जबाबदारी ज्याचे त्याचेवर राहून माझ्यावर अगर माझ्या मालमत्तेवर बिल्कूल राहणार नाहीं. जो या वर शेत व घर घेईल तो बुडेल कळावें ता० ११-२-१० इ.

सही

रामचंद्र देवचंद द० खु०

नो० नं० ट. ६८

## नोटीस

नोटीस बेशमी—– १ मारुती वल्द हिराजी दे०, २ शिवराम वल्द जैराम दे० ३ राजाराम आत्माराम देशमुख, ४ आकाजी वल्द चंद्रभान पाटील, ५ रावजी वल्द परशराम, ६ तानकू वल्द जानजी ७ नामदेव जैराम पाटील सर्व राहणार व्याळे ता० बाळापूर जिल्हा आकोला यांसः—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही वतनदार छापल्या त्यांतून नोटीस नंबर १९० ता. १७।११। १९०९ ची रा. रा. दाजी गंगाराम राहणार व्याळे यांस दिली आहे त्या नोटीस आमची मान्यता नसतां व आमचे मागें आमच्या खोट्या सह्या तुम्ही बनाऊ करून रा. दाजी गंगाराम या सारखे सद्गृहस्थास केवळ त्याचा अपमान करण्याचे हेतूनें तुम्ही ती नोटीस तुम्हांस कांहीं ही अधिकार नसतां दिली व आम्हांस फजीत केलें. श्री महादेव संस्थान व्याळे यांचे तुम्हास कोणी पंच नेमलें नाहीं व आम्हीही पंच नाहीं. तुम्हास कांहीं अधिकार नाहीं. आमचे दाजी गंगाराम यांशीं विनाकारण वकडें पाडण्याचा तुमचे आमची खोटा सही करून प्रयत्न केला आहे. तरी तुम्हावर फौजदारीत खोटा दस्तैवज करण्याबद्दल खटला करून त्याबद्दल वकीलाचा व कोर्टाचा जो खर्च आम्हास येईल त्याबद्दल दिवाणीत दावा करून तुम्हापासून भरून घेतला जाईल. कळावें. ता. १०-२-१९१० इ०

सही

परशराम रामजी माळी राहणार खेडे नि० खुद.

भगवान गवो माळी वाहोकार नि० खुद.

नो. नं. ट. ६९

## नोटीस

रा० व्यंकटसिंग रामसिंग रजपूत राहणार दहीद बु॥ ता० चिखली यांस —

खाली सही करणार यांजकडून, तुम्ही नोटीस दिली. तुमचे देणें नाहीं तुम्ही म्हणता रोजा कर्ज दिला ती रकम दिली आहे. रोखांत व्याज दर शेंकडा रुपया प्रमाणें आहे तुमचा दस्तैवज आमची कांहीं दस्तैवज मी नरसिंगराव यांस दोन महिन्यांपूर्वी खरेदी दिले. त्याची आमची रकमेंत कांहीं तर राहिली जुळल्यास नोंदून देऊं. नाहीं तर आम्ही वाटेल तेव्हां मागणी करूं. कळावें. ता० ९-२-१० इ०

सही

बापू रेवणाजी तेली द० खु०
मुक्काम देऊळघाट.

नो० नं० ट ७०

## जाहिरात.

लक्ष्मणदास माहिदास मालक रामरतन सेवाराम दुकान खामगांव यांजकडून.

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं बाळापूर ता० मजकूर जि० अकोला वऱ्हाड व सस्ती ता० बाळापूर जि० अकोला वऱ्हाड येथें आमच्या व शामलाल ओंकारदास यांच्याशीं रकमे माहिदास दुर्लभचंद या नांवानें चालत असलेलें दुकान एक याचा वटवाडा असाम्यांचा व चिल्लर जिनसांचा राहिला आहे. सस्ती येथील दुकानचा वटवाडा शराकतदार यांजकडून होणें राहिला आहे. बाळापूर सस्ती येथील शराकतीच्या दुकानासंबंधानें वासुदेव यशवंत समुद्र राहणार बाळापूर यांस आम्ही व शामलालजी मिळून दोघांचे सहीचें जनरल मुखत्यारपत्र दिलें होतें तें सदर्हू शराकतीच्या दुकानांतून कार्तिक शुद्ध १ समत १९६६ रोजीं आम्ही सदर्हू वासुदेव यशवंत यास नौकरींतून दूर केलें आहे सबब बाळापूर व सस्ती येथील दुकानांबंधी स्थावर जंगम संबंधीं खरेदी व गहाण वगैरे हरएक व्यवहार देणें घेणें वगैरे सदर्हू इसम करील तर आम्हांस मंजूर नाहीं. आम्ही वरील दोन्ही दुकानचे त्याचें मुखत्यारपत्र व आमचे खामगांव दुकानचें स्वतःचें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. व सस्ती येथील दुकानावर असलेला गुमास्ता शामराव यांस ही आम्ही नोकरींतून दूर केलें आहे. सदर्हू इसम सदर्हू दुकानासंबंधीं स्थावर जंगम संबंधीं खरेदी गहाण वगैरे हरएक प्रकारचा व्यवहार करील, कोणापासून रुपये घेऊन पावती देईल अगर कोणास रुपये देईल तर आम्हांस मंजूर नाहीं. जे कोणी यांजशीं व्यवहार करतील ते जबाबदार राहतील. कोणीही मनुष्यानें आमचा लेखी सही घेतल्या शिवाय सदर्हू दुकानाशीं कोणताही व्यवहार करूं नये कळावें. ता० ९ माहे फेब्रुवारी सन १९१० इ.

सही

लक्ष्मणदास माहिदास मालक
रामरतन सेवाराम दुकान
खामगांव यांची
[मारवाडींत]

नो० नं० ट. ७१.


इंदुप्रकाश, राष्ट्रमत, ज्ञानप्रकाश, काळ, मुंबईवैभव आदिकरून पत्रांकडून उत्तम अभिप्राय मिळालेलें.

**उद्यान मासिक:—** यांतील प्रमुख विद्वान व विदुषींचे लेख व कविता आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस वाचनीय असतात. शिळोप्याच्या वेळीं हास्यविनोद, मधुर संगीत व प्रेमकथालाप यांच्या योगें करमणूक करण्यात हें मासिक अद्वितीय आहे. चित्रें फारच सुबक असतात. पुस्तक अगदीं नियमित वेळीं प्रसिद्ध होतें. वा. व. फक्त दीड रुपया शिवाय ट. हं.

पत्ताः— 'उद्यान' ऑफिस
चर्नीरोड, मुंबई.
म्यानेजर 'उद्यान.'


## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९॥।- |
| मुंबई व्यांकेची सोन्याची चीप दर तोळ्यास | | २४॥८३ |
| चांदी | | ६३॥ |
| नवस | | १३९ |
| नवारी नवी | १८ | ६८ |
| गहूं काठे | | १२६ |
| गहूं खांडवा पीवळा | | १४० |
| गहूं बनशी | | १३९ |
| चणे | ४ | ४॥ |
| तुरी | | ३।= |
| उडीद | | ४॥ |
| मुंग | | ३॥ |
| टोळी मोहाचे बीज | | १९ |
| तेल | | ६।- |
| सरकी | | ११ |
| तुप | | ११ |
| कापूस | १० | ६९ |
| रुई आकोला जीन | | ८० |

## वर्तमानसार.

...केले
१९
...धिकाऱ्यानें
...लें.

सर हरबर्ट रिस्ले यांनीं वरिष्ठ कौन्सिलच्या आजच्या सभेपुढें सिलेक्ट कमिटीचा प्रेस बिलावरील रिपोर्ट सादर केला. या रिपोर्टाला ना. गोखले, मुधोळकर व मालवीय यांनीं आपलें भिन्न मतदर्शक टांचण जोडून सह्या केल्या आहेत. जामीनकीची अनामत रक्कम फार जास्त ठेवण्यांत आली आहे, पोष्टाच्या अधिकाऱ्यांना खासगी पत्रें वगैरे फोडण्याचे अधिकार देणें धोक्याचें आहे वगैरेसंबंधीं या नामदारत्रयांनीं भिन्न मतें प्रदर्शित केलीं आहेत. क्रिमिनल प्रोसीजर कोडचें १०८ कलम पुरेसें आहे असें नामदार गोखल्यांचें मत असून प्रस्तुत बिलामुळें अंमलबजावणी खात्यांतील अधिकाऱ्यांना जे वाजवीपेक्षां जास्त अधिकार देण्यांत येणार आहेत ते धोक्याचें आहे असें त्यांना वाटत आहे असें त्यांनीं सांगितलें. खून, राजकीय दरोडे वगैरे संबंधीं हिंदी पत्रकर्त्यांनीं जी कामगिरी बजाविली आहे तिचा सर रिस्ले यांनीं मुळींच उल्लेख केला नाहीं अशी त्यांनीं तक्रार केली. ॲंग्लोइंडियन पत्रकर्ते हिंदी सुशिक्षित लोकांवर जे बेसुमार कोरडे उडवितात त्या योगानें हिंदी लोकांचीं मनें करपून जातात असें ते ह्मणाले. प्रस्तुत बिलाच्या तत्वा विरुद्ध आपण नसून त्यायोगें अधिकाऱ्यांना जे विस्तृत अधिकार मिळणार आहेत त्याला आपण विरुद्ध आहों असें सांगून सरकारनें तडजोड व मुत्सद्दीपणाचें धोरण यांचाच जास्त स्वीकार करावा अशी त्यांनीं मोठ्या कळकळीची विनंती केली. या नंतर बऱ्याच सभासदांचीं भाषणें झालीं. ना. दादाभाई ह्मणाले कीं, प्रस्तुत बिलामुळें लहान सहान शहरांतील थोडक्या भांडवलावर काढणाऱ्या पत्रांना फार त्रास होणार आहे व आपलें ह्मणणें खरें आहे हें सिद्ध करण्याचा बोजा प्रतिवादीवर सर्वस्वी पडणार आहे. हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यसत्तेच्या हितासाठींच हिंदी वर्तमान पत्राची जरूरी असल्यामुळें या पत्रांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणें बरोबर नाहीं असें ना. मुधोळकर ह्मणाले. इत्यादि भाषणें झाल्यावर वरिष्ठ कौन्सिलांत १९१० चा प्रेस आक्ट पास झाला. नंतर ना. व्हाइसराय साहेबांनीं केलेल्या भाषणांत या बिलापासून हितकर परिणाम होतील अशी आशा प्रदर्शित केली. व हद्दपार झालेल्या लोकाची मुक्तता करण्यांत येत असल्याचें जाहीर केलें.

फरीदपूर येथील रहिवाशी बाबू ललित कुमार चक्रवर्ती यांस 'ते सर एल हेअर साहेबांच्या पाळतीवर असतात' असा आरोप ठेवून पोलीसनें चितगांग येथील डि. मॅजिस्ट्रेटच्या पुढें उभे केलें होतें; त्याचा आज निकाल लागून साक्षीच्या अभावीं बाबू महाशयांस निर्दोषी ठरवून सोडून देण्यांत आलें.

'आकाश' पत्राचे संपादक गणेशलाल यांनीं 'माफी' मिळण्यासंबंधी आणखी नवा [illegible]र्ज केला होता; त्यांत आपल्या हातून [illegible]त्या चुकीबद्दल दिलगिरी प्रदर्शित [illegible] पुन: आपण अराजक लेख लिहि[illegible] असें ह्मटलें होतें. त्या अर्जाचा [illegible] गणेशलाल यांस सोडून

प्रसिद्ध इतिहाससंशोधक मि. आर. पी. करकेरिया यांनीं वरील मथाळ्याखालीं टाइम्स ऑफ इंडियांत एक पत्र प्रसिद्ध केलें आहे. धूमकेतूचा उदय अथवा गति आणि प्रेसॲक्ट यांचा अन्योन्य संबंध असणें अशक्य असलें तरी हॅलेचा धूमकेतु व प्रेसॲक्ट यांचा यदृच्छासंबंध ( accidental coincidence ) असल्याचें दिसत आहे असें त्यांचें ह्मणणें आहे. २७ ऑगष्ट १८६९ रोजीं हॅलेचा धूमकेतु हिंदुस्थानांत दिसला व त्याच महिन्यांत हिंदी वर्तमानपत्रांस स्वातंत्र्याची देणगी देणाऱ्या कायद्याचें बिल मेटकाफनीं वरिष्ठ कौन्सिलापुढें आणलें व ता. १९ सप्टेंबर रोजीं त्या बिलास कायद्याचें स्वरूप आलें. त्यानंतर दोन महिन्यांनीं ह्मणजे ता. १६ नोव्हेंबर रोजीं धूमकेतु आपल्या कक्षेच्या सूर्याच्या अगदीं जवळ बिंदूंतून गेला. १९१० मध्येंही आणखी दोन महिन्यांनीं धूमकेतु आपल्या कक्षेंतील सूर्याच्या जवळच्या बिंदूंतून जाणार आहे. ह्मणजे १८३५ सालीं व १९१० सालीं सूर्याच्या अगदीं जवळून जाण्याच्या हॅलेच्या धूमकेतुच्या वेळेच्या आधीं हिंदुस्थानांत वर्तमानपत्राच्या कायद्यासंबंधानें कांहीं तरी गडबड चालू होती. हॅलेचा धूमकेतु आपल्या कक्षेंतील सूर्याच्या अगदीं जवळच्या बिंदूंतून जातांच वर्तमानपत्रांच्या कायद्यांत घडामोड होते असें नाहीं. १८७८ सालीं लॉर्ड लिटननीं मुद्रणस्वातंत्र्याची पीछेहाट करणारा कायदा केला तेव्हां धूमकेतू आपल्या कक्षेंतील सूर्यापासून अतिदूरच्या बिंदूपासून सूर्य व पृथ्वी यांकडे येण्यास नुकता निघाला होता. ता. १३ मे १७९९ रोजीं धूमकेतूची स्वारी सूर्यापासून अतीदूरच्या बिंदूजवळ होती व त्यावेळीं लॉर्ड वेलस्ली यांनीं हिंदुस्थानांत प्रेस सेन्सॉरशिप स्थापन केली अशा आशयाची माहिती मि. करकेरियांच्या पत्रांत आहे. काकतालीय न्यायाचें विलक्षण उदाहरण खरें !

सुमारें, १४ महिन्यांपूर्वी सरकारानें एकाएकीं हद्दपार केलेल्या ९ गृहस्थांची मुक्तता मोठ्या दयाळूपणें केली आहे ही बातमी ऐकून जिकडे तिकडे आनंदी आनंद होऊन गेला आहे. हद्दपार झालेल्या गृहस्थांच्या घरोंदारीं बंगाली लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊन आपलें प्रेम व्यक्त करीत आहेत. हद्दपार झालेल्या गृहस्थांच्या कुटुंबांतील माणसें परमेश्वराचे धन्यवाद गात आहेत. व्हाइसरॉयसाहेबांच्या दयाळूपणाबद्दल सर्वत्र वाहवा चाललेली आहे. मुक्त झालेल्या गृहस्थांचीं नांवें:— अश्विनीकुमार दत्त, सतीशचंद्र चतर्जी, पुलिन दास, भूपेशचंद्र नाग, कृष्णकुमार मित्र, श्यामसुंदर चक्रवर्ती, सुबोधचंद्र मल्लिक, शचींद्र प्रसाद बोस, मनरंजन गुह.

लिबरल व्हिप कॅप्टन नॉर्टन वॉल्वर्थ येथें बोलतांना ह्मणाले:— पंधरवड्याच्या आंत बजेट पास होईल. त्यानंतर लॉर्डाच्या व्हेटोच्या अधिकारावर हल्ला करण्यांत येईल. त्यानंतर लाचलुचपत व भेडसावण्या यांचा बंदोबस्त करण्याचें काम हातीं घ्यावें लागेल. डेली मेलनें पुढील आशयाची बातमी प्रसिद्ध केली आहे:—लॉर्ड मोर्ले इंडिया ऑफिसांतील जागेचा राजीनामा देतील असा संभव आहे. हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयाची जागा पतकरण्यास लॉर्ड क्रू तयार नाहींत. लिबरल पक्ष अधिकारावर राहील तर लॉर्ड किचनेर हिंदुस्थानचे व्हाइसरॉय होतील यांत संशय नाहीं.

चेंबर ऑफ कामर्स, ट्रेड्स असोसिएशन वगैरे संस्थांची सल्ला घेऊन, काच तयार करण्याचें काम शिकणारास दरमहा १५० रुपयेप्रमाणें दोन वर्षें मुदतीची स्कॉलरशिप देण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे.

सेंट्रल हिंदु कॉलेजचा फेब्रुवारी महिन्याचा अंक नुकताच बाहेर पडला आहे. सेंट्रल हिंदु कॉलेजांतील एक विद्यार्थी आगगाडींतून जात असतां त्या विद्यार्थ्याच्या डब्यांत बसलेल्या एका इंग्रजानें "चल जा, हिंदी कुत्र्या" असे शद्ब त्या विद्यार्थ्यास उद्देशून उच्चारले. या उद्धटपणाच्या वर्तनावर टीका करतांना, असल्या प्रकारासंबंधानें नीट विचार करण्याविषयीं मिसेस बेझंट यांनीं युरोपियन समाजास व सरकारास विनंति केली आहे. या टीकात्मक लेखांत मिसेस बेझंटनीं पुढील उद्गार काढले आहेत:—विद्यार्थी व उद्दाम इंग्रज या दोघांमधील तंटा निदान बाह्यत: तरी संपला आहे पण अशा प्रकारची भाषा अत्यंत हलकट अशा एखाद्या मजुरानें वापरली असती तरी त्याच्या जिव्हेला देखील ती लाज आणणारी आहे असें मी ह्मटलें असतें. उद्दाम वर्तन करणाऱ्या आडदांड इंग्रजा, तूं देशद्रोही आहेस अत्याचाराचा फैलाव होण्यास व लोकांच्या मनांत तिरस्काराचें बीं पेरण्यास तूं आपल्या वर्तनानें मदत करीत आहेस. माझ्या कॉलेजांतल्या ज्या हिंदी तरुणाशीं तूं अशा प्रकारचें वर्तन केलेंस तो तरुण, हिंदी व इंग्रज एकमेकांचें बंधु आहेत. असें मानण्यास शिकला होता; या तरुणाच्या गरम रक्तांत तूं आपल्या हातानें तिरस्काराचें अत्यंत जहर विष ओतलें आहेस. तुझें रक्त अशा प्रकारचें आहे कीं त्यापासून अनार्किस्टच पैदा होतील. तूं निघून जाशील पण तुझ्या गुन्ह्याचीं फळें तुझ्या पश्चात् तुझ्या भाईबंदांस भोगावीं लागतील.

गेल्या गुरुवारीं रात्रीं सइयामेद स्टेशनावर दोन पठाण पोलिस शिपायांनीं बरीच लुटालूट केली. स्टेशनावरील विक्रीचीं तिकिटें, रोकड, कपडे व इतर पोलिसांचीं हत्यारें या चोरांनीं लांबविलीं. या शिपायांनीं कांहीं दुकानें लुटून तेथून तीन हजारांची रोकड लांबविली.

सोमाली लँडमध्यें भयंकर पुंडावा सुरू झाला असून त्याचे योगानें पुष्कळ लोक प्राणास मुकले आहेत व हजारों उंट लुटले गेले आहेत. या पुंडाव्याचा मुल्लाशीं प्रत्यक्ष संबंध नाहीं असें सरकारचें ह्मणणें आहे.

आयर्लंडांत प्रसिद्ध होणाऱ्या 'रेनॉल्डस' पत्रामध्यें मि. टी. पी. ओकॉनोर यानीं एक लेख प्रसिद्ध केला आहे. लॉर्डांचा व्हेटोचा अधिकार मर्यादित करण्यासंबधानें मि. आस्क्विथ व राजेसाहेब यांच्यामध्यें पूर्वींच वाटाघाट झालेली आहे असें या लेखांत प्रतिपादिलेलें आहे.

धुलियाडा येथें ता. ६ रोजीं रात्री १९।२० दरोडेखोरांनीं मशाली पेटवून व हातांत लाठ्या, कुऱ्हाडी वगैरे घेऊन गोवर्धन प्रधान याच्या वाड्यावर राजरोसपणें दरवडा घातला. पुरुष पळून गेले, पण बायकांच्या अंगावरील सारी चीजवस्त चोरांनीं लुबाडून नेली यासंबंधांत अद्याप कोणासही पकडण्यांत आलेलें नाहीं.

मि. जगत्प्रसाद यांस निजाम हैदराबाद येथें आसि० अकौंटंट जनरल नेमण्यांत आलें आहे.

प्रो. परमानंद यांच्या खटल्यांत इन्स्पेक्टर रहिमतुल्ला यांची साक्ष झाली. ते ह्मणाले, "शिपायांचें बंड" या पुस्तकावर उर्दू भाषेंत लिहिलेलीं टिपणें माझ्या हातचीं आहेत, असें प्रो. परमानंद यांनीं कबूल केलें आहे. मि पेटमन यांनीं कोर्टास असें कळविलें कीं, प्रो. परमानंद यांचे जवळ असलेलें पुस्तक—बॉम्ब तयार करण्याचें संक्षिप्त पुस्तक—व नासिकचे सावरकर यांचेजवळ असलेलें पुस्तक व माणिक तोळा प्रकरणांत सापडलेलें पुस्तक हीं एकच आहेत अशाविषयीं कोर्टाची खात्री पटविण्यास मी कलकत्त्याचा एक व नाशिकचा एक असे दोन पोलिस इन्स्पेक्टर साक्षीस बोलावणार आहे.

---

**वऱ्हाडसमाचार.**

माघ शुद्ध ५ शके १८३१

---

## मुद्रण स्वातंत्र्याला आळा बसला!

—:*:—:*:*—

राजकीय सुधारणेच्या मनूला सुरवात करतांना प्रथमारंभींच मुद्रण स्वातंत्र्या सारख्या सुधारणेच्या मन्वंतरांतील स्वाभाविक हक्काला आळा घालून हिंदुस्थान सरकार कृतकार्य झालें आहे. राजकीय बाबतींतील प्रगतीचा स्वाभाविक हक्कांचें उच्चाटन असा अर्थ हिंदुस्थानांत होऊं लागला आहे. या अर्थाविरुद्ध ब्र काढणें हा महत्तम गुन्हा ठरविण्यांत आला आहे या मुळें वर्तमानपत्रकर्त्यांना सत्य सौम्य भाषेंत बोलणें सुद्धां अशक्य झालें आहे. या नव्या उपायाविषयींची इषारत कायदे कौन्सिलाच्या पहिल्या बैठकींत व्हाइसरॉय साहेबांनीं दिलेली आह्मी आमच्या वाचकांस पूर्वींच कळविली आहे. त्यानंतर गेल्या ता. ४ रोजीं भरलेल्या कौन्सिलांत होम मेंबर सर हर्बर्ट रिस्ले यांनीं मुद्रणस्वातंत्र्यास आळा घालणाऱ्या कायद्याचा मसुदा पुढें आणला

आणि नियाचे नियम तहकूब करून एकदम हें बिल सिलेक्ट कमेटीकडे पाठविण्यांत आलें. या नव्या कायद्याचे

### हेतु व कारणें,

सर हर्बर्ट रिस्ले यांनीं अशीं सांगितलीं आहेत कीं, ब्रिटिश राज्याविरुद्ध द्वेषभाव उत्पन्न करण्याचे प्रयत्न कित्येक पत्रांनीं अद्यापि सुरू ठेविले आहेत. स. १९०८ च्या वर्तमानपत्रांसंबंधाचा कायदा पास होण्यापूर्वी व त्या नंतर जे कित्येक गुन्हे घडले आहेत त्यांचा या पत्रांतील शिकवणीशीं प्रत्यक्ष संबंध आहे असें सिद्ध करण्यास पुराव्याची वाण नाहीं. अशा वर्तमानपत्रांच्या व फुटकळ हस्तपत्रकांतील लेखांचा मध्यम स्थितींतील सुशिक्षित तरुणांवर फार परिणाम होतो. खुनासारखे अत्याचार मारखे सुरू राहिल्यामुळें या भयंकर चळवळी समूळ नष्ट करण्यास आजपर्यंतचे कायदे पुरेसे कडक नाहींत. चळवळींच्या मूळ झऱ्याला धक्का लागलेला नाहीं असें आढळून आलें आहे. या कारणांस्तव छापखाने व वर्तमान पत्रें या या दोहोंवर व्यवस्थित दाब ठेवणें जरूर झालें आहे.

### बिलाचें स्थूल स्वरूप.

असें आहे कीं, वर सांगितलेले हेतु तडीस नेण्यासाठीं त्याचे मुख्य चार भाग केलेले आहेत. पाहिल्यांत छापखाने व प्रकाशनाचीं साधनें यांवर दाब ठेवण्याची व्यवस्था केली आहे. दुसऱ्यांत प्रकाशकांवर दाब ठेवला आहे. तिसऱ्यांत आक्षेपार्ह मजकुराच्या ब्रिटिश हिंदुस्थानांत होणाऱ्या आयातीवर व त्याच्या पोष्टमार्फत होणाऱ्या नेआणीवर दाब ठेवण्याचें योजलें आहे. आणि चवथ्यांत राजद्रोही व आक्षेपार्ह वर्तमानपत्रें, पुस्तकें व इतर कागदपत्र सांपडतील तेथें जप्ती, बंदी वगैरे मार्गांनीं बंदोबस्त करण्याची व्यवस्था केली आहे. या पुढें जे कोणी छापखान्याचे मालक या नात्यानें प्रतिज्ञालेख देण्यास येतील त्यांना जामीनगतीदाखल पांचशें पासून पांच हजार रुपयांपर्यंत रक्कम हजर करावी लागेल. या रकमेची माफी देण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेट यांस राहील. आक्षेपार्ह मजकूर छापण्याचे कामीं छापखान्याचा उपयोग झाला आहे असें दिसून आल्यास जामीनगतीची रक्कम सरकारजमा झाली असें जाहिर करण्याचा अधिकार स्थानिक सरकाराकडे राहील. आक्षेपार्ह मजकुरांत साधारणपणें खून किंवा सत्ताविध्वंसक अत्याचारास प्रोत्साहन देणारा, सैन्यांत अराजनिष्ठा पसरविणारा, जातिद्वेष उत्पन्न करणारा व हिंदुस्थान सरकारविषयीं किंवा देशी संस्थानिकांविषयीं अराजनिष्ठा उत्पन्न करणारा, आणि सामान्यतः सरकारी अधिकारी व नौकर यांच्या कर्तव्यात त्यांना धाक घालणारा किंवा शांतता भंग करणारा अशा मजकुराचा समावेश करण्यांत आला आहे. जामीनगतीची रक्कम एकदां सरकारजमा झाल्यावर प्रतिज्ञालेख रद्द होईल व तो पुनः करतांना पूर्वीच्या पेक्षा जास्त रक्कम ठेवावी लागेल. दोनदां जामीनगत सरकारजमा झाल्यावर छापखाना जप्त होईल. जामीनगत न देतां छापखाना किंवा पत्र चालू ठेवणाराला सन १८६७ च्या कायद्याअन्वयें शिक्षा होईल. आक्षेपार्ह मजकूर पोष्टद्वारें किंवा परदेशांतून कस्टम आफिसद्वारें जात येत असल्याचें दिसून आल्यास तीं पाकिटें फोडून निर्णयासाठीं प्रांतिक सरकाराकडे पाठविण्याचा अधिकार त्या त्या खात्यांकडे राहील. आक्षेपार्ह वाटणाऱ्या मजकुराचें कोणतेंही वर्तमानपत्र, पुस्तक किंवा इतर प्रकारचें वाङ्मय जाहिर हुकमानें बंद पाडण्याचा अधिकार स्थानिक सरकारास देण्यांत आला आहे. असा हुकूम निघाल्यावर असें वाङ्मय शोधण्यासाठीं झडती घेण्याचा अधिकार पोलिसास दिला आहे. जामीनगत सरकारजमा झाल्याच्या आणि वर्तमानपत्र वगैरेस बंदी केल्याच्या हुकमाविरुद्ध दोन महिन्यांचे आंत हायकोर्टाच्या तीन जज्जांच्या न्यायासनाकडे अपीलाची मोकळीक ठेवून बाकीचे सर्व मार्ग बंद केले आहेत.

### या प्रमाणें स्वरूपाच्या

### बिलाचें समर्थन

सर हर्बर्ट रिस्ले हे करतांना ह्मणाले, "या बिलानें सेन्सॉरशिप निर्माण करण्यांत आलेली नाहीं. मजकूर प्रसिद्ध करण्यापूर्वी तो प्रसिद्ध करणाराचे हातपाय कोणत्याहि प्रकारें जखडलेले नाहींत कायद्यानें घालून दिलेल्या मर्यादेचें अतिक्रमण न करतां आपले विचार व्यक्त करण्यास वाटेल तितकी सवड ठेवलेली आहे. सन १८७८ च्या कायद्यांत सर्व अधिकार अंमलबजावणी करणारांच्या हातीं ठेवलेला होता. पण प्रस्तुत बिलांतील व्यवस्था तशा प्रकारची नाहीं या कायद्याच्या बजावणीचा उपक्रम अंमलबजावणी खात्याकडून होणार आहे खरा तथापि वरिष्ठ न्यायाधिकाऱ्यांकडे अपील करण्याची सवड ठेवण्यांत आल्यामुळें अन्याय होण्याची भीति फारच कमी आहे. मर्जी वाटेल त्यास छापखाना किंवा पत्र काढण्याचा परवाना देण्याचा अधिकार या बिलानें सरकारच्या हातीं दिलेला नाहीं. जामीनगत घेणें व परवाना देणें या गोष्टी अगदीं निराळ्या आहेत. सार्वजनिक कामाविषयीं लोकांस शिक्षण देण्याची जबाबदारी शिरावर घेण्यास जे पुढें येतात त्यांच्या मनांत आपल्यावरील जबाबदारीची जाणीव रहावी ह्मणून त्यांच्याकडून जामीनगत घेणें यांत गैर काय आहे ?"

सर हर्बर्ट रिस्ले यांनीं या प्रमाणें बिलाचें समर्थन केल्यानंतर तें सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्यांत आलें. या कमिटींत ना. सिंह, ना. सर हरॉल्ड स्टुअर्ट, ना. केनरिक, ना. मि. लियॉन, ना. गोखले, ना. बरद्वानचे महाराज, ना. झुल्फिकारअलीखान, ना. मुधोळकर, ना. ग्रॅहाम, ना. माल्वीय व स्वतः ना. सर हर्बर्ट रिस्ले इतकी मंडळी होती.

### सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट

गेल्या मंगळवारच्या कौन्सिलच्या बैठकीपुढें सादर झाला. या रिपोर्टावर ना. मदनमोहन मालवीय हे खेरीज करून बाकी सर्व सभासदांच्या सह्या होत्या. ना. मदन मोहन यांचें विरुद्ध मताचें पत्र व आणि ना० गोखले व ना. मुधोळकर या दोघांचें मिळून एक विरुद्ध मतपत्र या रिपोर्टासोबत सादर झालें. रिपोर्टांत हायकोर्ट या शब्दाची व्याख्या कूर्ग व अजमीर मारवाड या भागाला लागूं करतां येण्याजोगी सुचविली होती. नंतर जामीनगत घेण्याच्या रकमेची मर्यादा पाच हजाराऐवजीं दोन हजार करावी असें सुचविलें होतें. कोणतेही कायदेशीर अधिकारी या ऐवजीं न्यायाची अंमलबजावणी करणारे असे शब्द पोट कलम सी मध्यें सुचविले होते. आणि जातीजातींतील निरनिराळ्या धार्मिक पंथांतील लोकांत भेदभाव या शब्दांऐवजीं ब्रिटिश हिंदुस्थानांतील बादशहांच्या प्रजाजनांकीं कोणत्याहि भागाविषयीं द्वेष किंवा तिरस्कार यांचा अंतर्भाव होईल अशी शब्दयोजना सुचविली होती. जामीनगत रक्कम रोख रुपयांच्या ऐवजीं सरकारी रोख्याच्या रूपानें भरली तर चालावी. पत्रें फोडून पहाण्याचा अधिकार पोष्टास देण्याची आवश्यकता कमिटीस दिसली नाहीं. पत्रें व पार्सलें खेरीज इतर पदार्थ आक्षेपार्ह वाटल्यास सरकाराकडे पाठवावेत. दोन न्यायाधीशांचे कोर्टांत मतभेद झाल्यास स्थानिक सरकारचा हुकूम कायम समजावा.

### लोकप्रतिनिधींच्या सूचना

बिलाच्या मसुद्यांत ना. गोखले व ना. मुधोळकर यांनीं एकविचारानें सुधारणा सुचविल्या होत्या. पहिली सूचना अशी होती कीं देशाच्या चिरकालिक कायदे बुकांत असल्या विलक्षण कायद्याला स्थळ मिळूं नये. ह्मणून तो फार तर तीन वर्षें अंमलांत रहावा. नवीनें प्रतिज्ञालेख करणारांच्यापासून सरसकट जामीनगत न घेतां प्रतिज्ञालेख लिहून देणारा इसम आपला छापखाना किंवा पत्र यांचा उपयोग आक्षेपार्ह लेख प्रसिद्ध करण्याकडे करील असा संभव वाटल्यास त्याच्या जवळून मात्र जामीनगत रक्कम ठेवून घ्यावी आणि स्थानिक सरकारनें जामीनकीची रक्कम सरकारजमा केल्याचें जाहिर करतांच प्रतिज्ञालेख जप्त करूं नये. हायकोर्टाकडे केलेल्या अपीलाचा निकाल होई तों प्रतिज्ञालेख कायम रहावा. ना मि. मालवीय यांनीं आपल्या विरुद्ध मतपत्रकांत असें लिहिलें होतें कीं राजद्रोहाच्या प्रसारास आळा घालण्यासाठीं झालेली क्रिमिनल प्रोसिजर कोडांतील सुधारणा पुरेशी आहे. मॅजिस्ट्रेटची ऑर्डर न्यायाधिकारी ह्मणून असावी. पण स्थानिक सरकारचा हुकूम नको. हायकोर्टांत मॅजिस्ट्रेटची ऑर्डर जावी. हें तत्व पन्नास वर्षांपासून अनुसरलें जात आहे. स. १८७८ च्या कायद्याविषयीं मि. ग्लाडस्टन यांचे असे शब्द आहेत. 'राजद्रोही लेख कोणता आहे आणि कोणता नाहीं ठरविण्याचें काम न्यायखात्याचे हातून काढून सरकारनें आपल्या हातीं घेणें शहाणपणाचें आहे कीं काय इत्यादि नाजूक प्रश्न या कायद्यामुळें उपस्थित होतात.' या मताच्या स्वरूपाची उपसूचना ते आणणार होते. हा कायदा जरूर असेल तेथेंच चालूं करावा व त्याची मुदत फार तर तीन वर्षें असावी

### बिलावरील वादविवाद

विशेष वादाक्याचा झाला नाहीं. या बाबतींत ना. मि. मदन मोहन मालवीय व ना. भूपेंद्रनाथ बोस यांच्या खेरीज बाकीच्या सर्व लोकप्रतिनिधींचें मत ना. गोखले यांनीं ह्मटल्याप्रमाणें देशस्थितीचा विचार करतां बिलांतील तत्वांस आडथळा आणणें चुकीचें आहे असें दिसून आलें. ना. गोखले यांनीं आपल्या भाषणाच्या शेवटीं बेजबाबदार अँग्लोइंडियन पत्रांच्या कित्येक लेखांमुळें आपल्या काळजास घरें पडतात असें ह्मणून त्यांचा बंदोबस्त व्हावा अशी विनंती केली. सरदार प्रतापसिंह ह्मणाले हिंदी गृहस्थांनीं अराजनिष्ठ पत्रें आपल्या ताब्यांत घेऊन तीं बंद तरी पाडावीं किंवा त्यांच्या धोरणांत सुधारणा तरी करावी. कुरुपानचे राजे ह्मणाले सरकारनें सार्वजनिक टीका बंद पाडूं नये असें मला वाटतें. ना. मि. दादाभाई यांचें मत या कायद्याच्या परिणामविषयीं निराशापूर्ण होतें. ते ह्मणाले दडपशाहीच्या मार्गांतलें हें पुढें पाऊल आहे. तथापि यानें मुद्दां उद्देश साधण्याची शंकाच आहे. सध्याच्या बिलाला अराजकांचें उन्मूलन करण्याचे कामीं यश येणार नाहीं अशी मला भीती वाटते. ना. मुधोळकर ह्मणाले अराजक चळवळ ही थोडे दिवसांची विकृति आहे. तिच्यावर या उपायांची योजना होऊन आवश्यकता नाहींशी झाल्यावर एकहि दिवस तो चालू ठेवूं नये. न्यायखात्याच्या उपायाऐवजीं अंमलबजावणी खात्याच्या हातीं कायमची सत्ता देऊन टाकणें इष्ट आहे कीं नाहीं याचा कौन्सिलनें विचार करावा. ना. चिटणविस ह्मणाले, कुमार्गगामी तरुणांस वाटेवर आणण्यास कांहीं तरी निराळे उपाय योजले पाहिजेत. ना. झुल्फिकार अलीखान ह्मणाले, मुद्रण स्वातंत्र्य इतकें चेपून टाकणें कोणत्याही सुधारलेल्या सरकारास योग्य वाटणार नाहीं. पण अराजकांच्या कटामुळें मुद्रण स्वातंत्र्याचा दुरुपयोग चालू देतां येत नाहीं.

### बिलावर मुदेसूद टीका

ना. भूपेंद्रनाथ बोस व ना. मदनमोहन यांनीं केली. ना. भुपेंद्रनाथ ह्मणाले, 'कांहीं तरी उपाय योजला पाहिजे खरा पण हें बिल मला क्षणभर मुद्दां मान्य नाहीं. यानें गुन्हे थांबणार नाहींत. रशियाचें उदाहरण पहा. दारिद्र्यामुळें तरुण मुलें भडकतात. बिलाचे परिणाम वाईट होतील. ज्ञानाची वाट खुंटेल. गरीब व प्रतिकूल परिस्थितीशीं झगडणाऱ्या मुद्रण स्वातंत्र्याला यानें कोंडमारा होईल. कांहीं पत्रें जिवंत रहातील खरीं पण या बिलापेक्षां सेन्सॉरशिप पतकरली!' ना. पंडित मदन मोहन ह्मणाले, सांप्रतच्या अनिष्ट स्थितीचें पातक वास्तवीक लॉर्ड कर्झन यांच्या पदरीं बांधलें पाहिजे. सरकारनें खरीं कारणें लक्षांत घेतलीं पाहिजेत. असल्या कायद्यानें असंतोषाचें निर्मूलन न होतां तो अधिक वाढेल आणि लोकांपासून जामीन घेताना त्यांचा अपमान केल्यासारखें होईल.

सर हॅरॉल्ड स्टुअर्ट, ना. मि केनरिक ना. मि. लायन, ना. मि. सिंह इत्यादि सरकारी सभासदांनीं बिलाचें समर्थन केल्यावर मतें घेण्यांत आलीं. पंचावन उपसूचनांपैकीं दोन केमतीने मान्य झाल्या. ना. गोखले यांच्या दोन्ही सूचनांना अनुक्रमें ९ व १६ मतें मिळालीं त्या मुळें विरुद्ध मताधिक्यानें त्या नामंजूर होऊन बिल पास झालें.

———

## प्रेस ॲक्ट.

—:*:-:*:—-

हा प्रेस ॲक्ट ह्मणजे इंडियन वातावरणाचा चित्रपट होय. या चित्रपटांत सद्यस्थितीच्या रूपरेषा रेखाटलेल्या आहेत. अफाट समुद्रामध्यें भयंकर धोक्यांच्या जागा दाखविण्यासाठीं जसे दीपस्तंभ असतात तसेच विचार समुद्रांतील अराजक प्रवृत्तींचीं स्थळें दाखविणारे हे कायद्याचे दीप होत. सरकारी जहाज या स्थलीं अराजक खडकांपासून दूर ठेवण्याची जबाबदारी लोकांवर आहे. हे धोक्याचे खडक व्यवहारांत वापरलेल्या लोकांना जसे दिसतात तसेच ते देशांतील तरुण पिढींना दिसण्याचा संभव अनुभवाच्या अभावामुळें फार कमी असतो. आणि त्यामुळें पुष्कळदां तरुण मंडळी राष्ट्रसेवेच्या मिथ्या भासानें आपल्या जिवाचीही पर्वा न करितां अराजक कार्यांत पडतात आणि बाँब, खून इत्यादि अत्याचार त्यांच्या हातून घडतात. त्यांची ही प्रवृत्ति होण्याला कारण त्यांच्यापुढें मांडलेली दूषित विचारसृष्टि होय. सरकारच्या राज्यकारभाराला अपाय होऊं नयेत, आणि तरुण मंडळींना निदान राज्यक्रांतीच्या विमार्गापासून अलिप्त ठेवावें ह्मणून हा नवा कायदा सरकार अंमलांत आणित आहे. आणि त्या त्यांच्या स्तुत्य संकल्पाप्रमाणें पत्रकारांनीं व छापखानेवाल्यांनीं आपला मार्ग नीट रेखाटून ठेवला ह्मणजे आह्मास वाटते कीं या नव्या कायद्यामध्यें भितीप्रद असें कांहींच नाहीं आणि मुद्रण स्वातंत्र्यावर ही गदा आहे असा मनावर जो एकदम उद्वेगाचा झटका येतो त्याची तीव्रता व त्याची शल्यासारखी झोंबणारी तीक्ष्णता हीं सिंह, मुधोळकर सारख्या सद्गृहस्थांच्या विचारांचें मनन करतांना आपोआप क्षयास जातील. आह्मी तर असें समजतों कीं मुद्रण स्वातंत्र्य हा प्रजेचा हक्क आहे असें ह्मणण्यापेक्षां प्रजेला प्रेमानें आपलीशी करणारी सरकारची गुरुकिल्ली होय. आणि सरकार जर या कायद्याच्या किल्लीनें मुद्रणस्वातंत्र्याच्या दरवाज्याला कुलुप लाविल तर मात्र आह्मी समजूं कीं सरकारनें आपल्या हातानेंच अराजक्रांतीचे दरवाजे खुले केल्यासारखे होईल तेव्हां कायद्यानें तितके मुद्रण स्वातंत्र्याची मर्यादा विस्तृत करण्याची सर्व जबाबदारी आतां एकट्या सरकारावरच राहिली आहे.

या नव्या कायद्यानें दुसरा एक लाभ होण्याचा संभव आहे. जेव्हां जेव्हां समाजांतील अग्रणी लोकांवर राजद्रोहाचे खटले करण्यांत आले तेव्हां तेव्हां त्यांचे फार हाल, अप्रतिष्ठा व अपमान घडलेले आहेत. यापुढें फौजदारी कोर्टांतून राजद्रोहाचे खटले बहुदा होणार नाहींत आणि राजद्रोहाच्या खटल्यामुळें जे राजद्रोहाचे विचार अधिक प्रसृत होत असत तसाही प्रकार फार क्वचित् यापुढें घडेल. सरकारापाशीं ५०० पासून २००० पर्यंत रकमेची जी हमी रहाणार आहे ती रक्कम न बुडवी ह्मणून जो तो आपल्या विचारांच्या प्रकाशनाचा मार्ग पुनः पुनः तपासून पहात जाईल. आणि ज्या कांहीं पत्रकारांना या अवघड, अरुंद व कड्यावरच्या निमुळत्या मार्गानें आपल्या शरीराचा तोल संभाळून चालतां येणार नाहीं त्या पत्रकारांपैकीं कित्येकांनीं राजकीय विषयांना अतःपर आपल्या वर्तमानपत्राच्या स्थानांतून फाटा दिला आहे असें जाहिर केलें आहे. हा नवा कायदा ह्मणजे आपले विचार सुसंस्कृत करण्याची शाळाच होय आणि या शाळेमध्यें जर सरकार ह्मणजे प्रजेहून कांहीं निराळी संस्था आहे असा भिन्न भाव वाटतो तो अंशतः दूर होईल आणि सरकाराविषयीं प्रेमभाव वाढेल तर भावी राष्ट्रकार्याला त्यापासून पुष्कळ फायदा होईल पण ही गोष्ट प्रजेच्या हातांत आहे ह्मणण्यापेक्षां सर्वैव सरकारच्या हातची आहे असें आह्मी समजतों प्रजेचे हक्क बहुगुणित करण्याविषयीं दक्षता व प्रजेच्या कल्याणामध्येंच आपलें कल्याण अशी एकमार्गी दृष्टि या कायद्याच्या अंमलबजावणीमध्यें सरकार जागृत ठेवील तर हा नवा कडक कायदाहि प्रजेचा एखाद्या निर्जिव कायद्याप्रमाणें वाटेल.

## विचार स्वातंत्र्य.

—-:*-:*:-:*:-—

या कायद्यानें मुद्रण स्वातंत्र्य मर्यादित केलें. मुद्रण स्वातंत्र्य ही सरकारची देणगी व ती सरकारला अंशतः तरी परत घेतां आली पण विचार—स्वातंत्र्य ही ईश्वरी देणगी आहे आणि ती कोणाला परत घेतां येणार नाहीं. विचाराच्या प्रकाशनाला बंदी करतां आली तशी विचाराच्या उत्पत्तीला बंदी करतां येणार नाहीं. विचारांची उत्पत्ति किंवा लय हीं विचारानेंच घडून येतात. जर अराजक विचार हल्लीं प्रसृत आहेत तर त्यांचा लय करण्याला दुसऱ्या उच्च प्रतीच्या विचारांची उत्पत्ति झाली पाहिजे. अराजक विचार सरकारच्या कार्पण्यानें व अनुदार कृतीनें उत्पन्न होत असतात. आणि ते तसे नको असल्यास त्याला खरा उपाय ह्मणजे दुसरे प्रेमाचे व प्रजावात्सल्याचे विचार सरकारानीं प्रदिप्त केले पाहिजेत.

हा नवा प्रेस ॲक्ट अराजक क्रांतीच्या रोगाला खरें औषध नाहीं. जेव्हां अराजक गोष्टी बहिरफूट होतात तेव्हां तन्निमित्त पुढें येणाऱ्या व्यक्तींचा निषेध करण्याचा परिपाठ पडला आहे. पण त्याचा खरा उगम सरकारांतून होत असलेल्या लोकांच्या पायमल्ली मध्यें आहे. आह्मी राज्यकर्ते या अरेरावीनें जेव्हां जेव्हां लोकांचीं अंतःकरणें तोडलीं जातात तेव्हां तेव्हां राज्यकर्त्यांना प्रजा निराळी लेखूं लागते आणि मनाची ही उत्सारण क्रीया सुरू झाली ह्मणजे सरकार व प्रजा यांच्या मधील द्वंद्व युद्धाला प्रारंभ होतो. राष्ट्रीय सभेसारख्या लोकसंस्थेला जेव्हां सरकार पाव शतकाच्या विचारा नंतरही अवमानितच करतें आणि प्रजेला ज्या राज्यकारभारांमध्यें आपल्या महत्वाकांक्षा, उदारचारित्र, व स्फूर्ती यांना योग्य स्थळ मिळत नाहीं, सरती होते तेव्हां प्रजेची त्या सरकाराविषयीं आस्था व कळकळ हीं नाहींतशीं होतात. आज पर्यंत राज्यकर्त्यांच्या हातून ज्या ज्या चुका घडल्या आहेत त्या सर्वांची मोळी लॉर्ड मोर्ले यांनीं आपल्या शिरावर घेतली आहे. आणि प्रस्तुत सारख्या बिकट व नाजूक प्रसंगींही त्यांनीं आपलीं जीं उदार तत्वें जागृत ठेवलीं आहेत त्यांचा सुपरिणाम हल्लींच्या क्रांतीच्या कालींहा स्थीर झालेल्या शांतिमध्यें चांगल्या प्रकारें दिसून येतो. आजवरच्या चूकांची फेड उदार राजनीतीनें जसजशी होत जाईल तसा तसा हा अराजकपणाचा रोग आपोआप नाहींसा होईल. ब्रिटिश सरकारचे कितीही धन्यवाद गाण्यांत आले तरी लोकांच्या मना मधील प्रस्तुतचे विचार बदलले जाणार नाहींत तों पर्यंत अराजकपणाला हें औषधच पोंहचणार नाहीं. हल्लींचा तिरस्कार किंवा द्वेषभाव नष्ट करण्याला राज्यकर्त्यांनीं प्रेमाचा व सौजन्याचा किता उचलला पाहिजे ब्रिटिश या नांवाची इंडियाला गोडी वाटण्या सारख्या गोष्टी घडा जातील ह्मणजे उदाहरणार्थ ट्रान्सव्हालच्या राज्यांत इंडियनला ब्रिटीश प्रजेचे हक्क मिळतील, ब्रिटीश न्यायबुद्धीवर लोकांचा पूर्ववत विश्वास बसेल आणि ब्रिटीश राज्याखालीं राहणें अधिक अधिक सुखाचें वाटत जाईल तरच भविष्य कालिन मार्ग उभयपक्षीं कल्याणप्रद होण्याचा संभव आहे इंडिया हें जर ब्रिटीश राज्याचें हृदय आहे तर त्या राज्याच्या सर्व हालचाली सुयंत्रित चालण्यासाठीं या हृदयाला फार काळजीनें अविकृत ठेवण्यापासूनच प्रस्तुतची अराजकपणाची क्रांति दूर होईल.

## सहकारी पतपेढ्या.

—:०+०:—

इंडिया मधील सहकारी पतपेढ्यांच्या रजिस्ट्रारांची जाहिर सभा गेल्या नार्व्हेंबरांत कलकत्ता येथें भरली होती त्या सभेच्या कामाचा रिपोर्ट नुकतांच प्रसिद्ध झाला आहे त्यावरून असें दिसतें कीं या सहकारी पतपेढ्या उत्तरोत्तर अधिकाधिक लोकप्रिय होत चालल्या आहेत सर्व पेढ्या २००८ असून त्यांच्या भागीदारांची संख्या १,८४, ८९७ आहे. एकंदर वार्षिक आढावा ८४ लक्ष रुपयांचा आहे. मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून ५ सेंट्रल पेढ्या असून त्या इतर पेढ्यास कर्जाऊ रकमा देतात. त्यांचें भांडवल ९२४०२ रुपये आहे. ८ अर्बन ह्मणजे नागरिक पेढ्या असून भांडवल ६१ हजार रुपये आहे. आणि खेडेगावांतून ८७ पेढ्या असून त्यांचें भांडवल ९० हजार रुपये आहे एकंदरीनें पाहतां पंजाब, मध्यप्रांत व बंगाल या इलाख्यां मधून भांडवलाचा पुरवठा भरपूर होण्या सारखा आहे आणि जसजशी पतपेढ्यांची संख्या वाढेल व त्यांची भरभराटी होत जाईल त्या मानानें लोक वाटेल तितकें भांडवल आपोआप उभारूं शकतील. या तिन्ही इलाख्यांतून भांडवलांची कमतरता नाहीं ही मोठी समाधानाची गोष्ट आहे वऱ्हाड प्रांतांत या सहकारी पतपेढ्या फक्त आकोला जिल्ह्यांत स्थापन केलेल्या आहेत. त्यांच्या पैकीं बहुतेक संस्था सुस्थितीत आहेत आणि त्या वरून असा अंदाजा आहे कीं सर्व प्रांतभर यांची स्थापना झाली पाहिजे. या संस्था अद्यापि सरकारी समजल्या जातात पण त्यांच्या विषयीं लोकांची अभिरुची उत्पन्न करणाचें काम समाजांतील पुढाऱ्यांचें आद्य कर्तव्य आहे. सहकारी तत्वें हींच समाजाचीं खरीं बंधनें आहेत आणि त्यांच्याच शक्तीनें हिंद समाज इंडियन राष्ट्राची इमारत उभारूं शकेल. सहकारी पेढी ही पहिली शाळा आहे आणि तिच्या उत्कर्षावर पुढील गोष्टी अवलंबून आहेत.

बाल वक्तृत्व सभा— केळीवेळी येथेंही २५ वी वार्षिक सभा ता. २६ फेब्रुवारी रोजीं भरणार आहे. रा. रा. सूर्यभान जावजी हेडमास्तर हे या संस्थेचे आद्य गुरु आहेत आणि त्यांच्या परिश्रमानें ही सभा इतक्या यशश्रीनें चालू आहे. मुलामुलींच्या कारागिरीच्या पदार्थांचें प्रदर्शनही मांडण्यांत येणार आहे.

---

## वऱ्हाडवृत्त.

---

हवामान—-थंडी साधारण असून सार्वजनिक आरोग्य असमाधानकारक आहे. आकोला, बुलढाणा या दोन जिल्ह्यांमध्यें प्लेग एकसारखा वाढत चालला आहे. आकोट व आकोला हे दोन तालुके प्लेगानें अगदीं जरजर झाले आहेत. आकोल्यास हल्लीं दररोज १०।१५ इसम मरताहेत.

येथील तहशिलींतील शहानवीस रा बळवंत अंबादास यांस प्लेगानें देवाज्ञा झाली हें कळविण्यास फार खेद वाटतो. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो.

धामधूम— मध्यप्रांताच्या ताब्यामध्यें बस्तरचें संस्थान आहे. तेथील राजे साहेबांनीं नुकतीच खबर दिली आहे कीं त्याच्या संस्थानांतील मुकच्या रहिवाशी लोकांनीं एक बंड केलें आहे. त्याचें कारण समजत नाहीं. त्या लोकांनीं बाजारची लुटालूट केली. पोलिस स्टेशनें व शाळागृहें जाळून टाकलीं व संस्थानिकांच्या एका अंमलदाराचाही नायनाट करण्यांत आलें आहे. या लोकांचीं शस्त्रें अस्त्रें ह्मणजे त्यांचे धनुष्यबाण होत. १२० पोलिस लोकांची टोळी तिकडे रवाना करण्यांत आली असून लवकरच ही धामधूम मोडेल असा संभव आहे.

रा. रा. ड्रेकब्रॅकमन ज्युडिशिअल कामिशनर हे लवकर मोठ्या रजेवर जाणार असून त्यांच्या जागीं रा. रा. बॅटन हे आॅफि. ज्यु. कमिशनर होतील.

रा. रा. ए सी. आर्मस्ट्रांग यांस पोलिस सुपरिंटेंडंटच्या दर्जाची बढती देऊन यवतमाळ येथें नेमण्यांत आलें आहे. यानीं मागें उमरावतीस जो दरवडा पडला होता तो मोठ्या शिताफीनें पत्यांत आणला होता.

पहूर जिल्हा यवतमाळ येथील शाळा मास्तर देवीदास व वासुदेव बल्लाळ यांना त्यांनीं मुलाना राजद्रोही पदें शिकविल्याबद्दल २ वर्षांची सक्तमजुरी व २०० रुपये दंड अशी शिक्षा देण्यांत आली.

## स्वस्थ बसूं नका, हंगाम जवळ आला.



दिपावळी व तुळशीच्या लग्नाचे दिवस ह्मणजे ऐन हुरड्याचे दिवस होत. ह्या नंतर पंधरा वीस दिवसांनीं जोंधळा कापतात व लगेच जमीन नांगरण्याच्या हंगामास सुरवात होते. जमीन नांगरण्यास लांकडी नांगरापेक्षां **लोखंडी नांगराचाच** जास्त उपयोग होतो, हें तुह्मांस माहीत झालें आहे. व हजारों लोकांनीं आमच्या लोखंडी **नांगरा** पासून आपला फायदा करून घेतला आहे ह्मणून तुमचाही झालाच पाहिजे. तर आतां दिवसगत न करितां हंगाम जवळ आला हें लक्षांत आणून लोखंडी नांगराची त्वरित मागणी करा. ह्मणजे तुमचाच फायदा खात्रीनें होईल.

**किर्लोस्कर बंधु, बेळगांव.**

नो. नं. झ ६७

## शिवाजी छापाच्या पुतळ्या.



वज्रटीक, फिरकीचीं फुलें, बुगड्या, चांदीचे तोंडे, मासोळ्या, शर्टचीं बटनें, लहान मोठीं भांडीं व मूर्ती सर्व प्रकारचे दागीने मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

**कमिशन घेऊन पाठविण्याचा माल—**

नाशिकचा हरएक प्रकारचा माल चौथाई रक्कम आल्यास व्ही. पी. नें पाठवूं.

**केशव भाऊशेट सोनार कमेटी शेजारी दुकान नाशिक.**

नो. नं. छ. ३

सत्रा वर्षांपासून परीक्षित व सरकाराकडून रजिष्टर केलेला.

## सुधासिन्धु

कालरा, ( पटकी ) दमा, खोकला, कफ पोटशूल, अतिसार, संग्रहणी, जुलाब, अतिनिद्रा वातजन्यरोग, व मुलांचे रोग या सर्वांवर एकच स्वादिष्ट व रामबाण औषध. प्रत्येक शिशीची किंमत ॥. एका डझनास रुपये ५ टपाल हांशील १ पासून ४ पर्यंत ८ आणे व डझनास ।. आणे. एकदम १ घेणारास १ फुकट पूर्ण माहिती व सरटिफिकीट पाहण्याकरितां क्याटलाग फुकट पाठवूं. प्रत्येक ठिकाणीं एजंट पाहिजेत, नियम मागवून पहा.

मिळण्याचा पत्ता

**सुख संचारक कंपनी,**

नो. नं. ष. ९३ मथुरा.


## नोटीस

नोटीस बेशमी ठाणेराव वल्द इरोजी देशमुख राहणार मौजे पोहंडुळ प्रगणे माहूर तालुके पुसद जि. यवतमाळ यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मीं मजला मारहाण विनाकारण करून घरांतून काढून दिल्यामुळें मी आज दोन वर्षांपासून बापाचे घरीं राहिलें. मारहाण केल्यावर दोन चार महिन्यांतच दोन वेळां माझे बापानें पंच बरोबर घेऊन तुमचे घरीं आणून घतलें होतें पण तुह्मी दोन्ही वेळेस पंचा समक्ष माझ्या बापास शिवीगाळ करून मी तुमचे मुलीस वागवीत नाहीं ह्मणून सांगितलें. तुमचे माझे लग्नास पंधरा सोळा वर्षें झालीं. असून तुमचे घरीं मजला तुमचे पोटचीं दोन मुलेंही झालीं होतीं इतके दिवस मी तुमचे घरीं चांगली वागली असून अलीकडेस तुह्मी आपल्या वडिलाचे सांगण्यानें वैरभावानें वागून माझ्याशीं बेबनाव केला तरी आज दोन वर्षांपासून मी आपले बापाचे घरीं दुसऱ्याचें कर्ज काढून निर्वाह करीत आहे. मजला दरमहा ५ रुपये प्रमाणें आज सित्तीस १२० रुपये खर्च लागला आहे. तें कर्ज माझे बापानें दिल्यामुळें तुह्मास या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं नोटीस पावल्यापासून १ महिन्याचे आंत माझे बापास १२० रुपये नगदी देऊन मजला घरीं घेऊन जावें. नाहीं तर ही नोटीसच मी सोडचिठ्ठी समजून मी दुसरा शरीरसंबंध करीन. या गोष्टी विषयीं मजला जाती पंचाचाही रुकार मिळाला आहे. ही नोटीस लिहून दिली. सही दस्तुर शंकर बाबा गडवे रहाणार महागांव.

सही

हारणी मर्द ठाणेराव देशमुख निशाणी हातची बांगडी खुद्द

नो० नं० ट. ६१

## नोटीस

नोटीस महादु वल्द गोविंदा तिडके जात माळी राहणार जुने जालना जिल्हा औरंगाबाद यांस:—

खालीं सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून मी माझ्या बापाच्या येथें सरासरी ४ वर्षें झालीं असून तूं मला नेण्या करितां येत नाहीं. याचें कारण काय असावें हें मला बिलकूल समजत नाहीं. मला माझ्या बापाच्या येथें खाण्याचा व लत्याकपड्याचा खर्च अजमासें २०० रुपये झाला आहे. तरी तुह्मी हे रुपये स्वतः घेऊन येऊन मजला घेऊन जावें. मी येण्यास तयार आहे. जर तुह्मी ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत खर्च देऊन मला घेऊन न गेल्यास ही फारकती मी समजेन. मग मजवर तुमचा नवरेपणाचा हक्क रहाणार नाहीं. कळावें. तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १९१० इ० सही

राधी मर्द महादु माळी रहाणार टेंद्री तालुके चिखली निशाणी हातची बांगडी.

नो० नं० ट. ६२

## जाहिरखबर

मी खालीं सही करणार, अशी जाहिर खबर देतों कीं मजला कोणाही सावकाराचें कर्ज नाहीं आणि मी कोणासही जामीन वगैरे झालों नाहीं व कोणाजवळ मीं माझें शेत गहाण अगर खरेदी दिलें नाहीं. गांवांतील कांहीं बदमाष लोक विनाकारण माझें नांव दस्तऐवजावर टाकून माझी खोटी निशाणी करतात व मजला विना कारण नागावतात. तरी या जाहिर खबरीनें मी सर्वत्रांस असें कळवितों कीं जर माझ्यावर कोणी अशा तऱ्हेनें देणें काढील अगर कोणी माझ्या पाठीमागें माझें नांव जामिनकींत घालील व माझी निशाणी करील तर ह्या सर्व गोष्टीबद्दल मी मुळींच जबाबदार राहणार नाहीं. कळावें. तारीख ३।२।१९१० इ०

सही

भिवाजी वल्द नारायण माळी साती राहणार जळगांव वऱ्हाड याची निशाणी.

नो. नं. ट ६३

## नोटीस

नोटीस बेशमी मयनी मर्द महासिंग जात रजपूत राहणार बावनबीर तालुके जळगांव इस:—

मी खालीं सही करणार नोटीस देतों कीं माझे मालकीची सर्व जिनगी तुझे नवऱ्याचे ताब्याच होती त्या वेळेस मी अज्ञान होतों. मी सज्ञान झाल्या बरोबर तुझा नवरा मयत झाला घरांतील सर्व जिनगी तुह्मी आपले भावाचे घरीं माझे पश्चात नेली. आतां तुह्मी जबरीनें शेतांतील माल मुसलमान लावून आणला आहे व गोऱ्हा माझा असल्यावर तुह्मी विकूं पहातां व सर्व जिनगीची अफरातफर करून नवरा करूं पाहतां व सावकार लोकांना एक पैसा सुद्धां तुह्मी दिला नाहीं. माझे भावाचा मुलगा आहे त्यास व मला भिकारी करूं पाहतां असें तुह्मी न करितां नोटीस पावल्या दिवसापासून पंधरा दिवसांचे आंत सावकार लोकांचें कर्ज तुह्मी द्यावें व घरांतील डागीने नेले ते आणून द्यावे. व गोऱ्हा विकूं नये. विकल्यास पैसे भरून घेतले जातील व तुह्मी हरहमेशा माझ्याशीं तक्रार करितां हें बरोबर नाहीं. हा सर्व बंदोबस्त नाहीं झाला तर पुढें तुह्मी माझ्याशीं कोणतेच गोष्टीचा जबाब विचारल्यास मी ऐकणार नाहीं. व माझ्यावर फिर्यादफांटा केल्यास त्याची जबाबदारी माझ्यावर नाहीं. व मागें तुह्मीं आपले हातानें आपलें डोकें फोडून पाटलाचे घरीं फिर्याद करण्यास गेले होते. व एक वेळ माझे पाठीवर पोरगा फेंकून मारलें होतें. आतां तुह्मी असें केल्यास तुह्मांस पोलिसचे ताब्यांत देण्यांत येईल. व त्याबद्दल तुला व तुझे मुलास कांहीं धोका आल्यास त्याची जबाबदारी माझ्यावर राहणार नाहीं कळावें. तारीख २९।१।१०

सही

किसनसिंग महेतापसिंग रजपूत मु० व पोष्ट बावनबीर ता० जळगांव.

नो० नं० ट. ६४

## नोटीस

१ कोंडो बिठ्ठल जोशी

२ शिवराम तुकाराम देशमुख

३ आत्माराम सखाराम देशमुख राहणार तिघे वडाळी

४ नारायण उद्देभान पाटील राहणार मंचनपूर ( पोष्ट आसेगांव )

५ लालजी बिठोबा पाटील राहणार सावरे ता० अकोट यांस:—

तुळसा मर्द जैराम रोही राहणार वडाळी इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे वडाळी ता० आकोट येथील श्रीगणेश जैरामनाथ महादेव या संस्थानाचे तुह्मी सर्व वहिवाटदार आहेत. या संस्थानाचे व्यवस्थे साठीं माझ्या मयत भ्रतराचे ( जैराम ) नवऱ्यानें आमची स्वसंपादीत स्थावर मालमिळकत आमच्या उभयतांच्या मरणा नंतर वरील संस्थानाकडे लावून दिली आहे हें मला ठाऊक आहे. मला पुत्रसंतान नाहीं. सबब तुह्माकडे या मिळकतीची व्यवस्था तुह्मी मला खाण्या पिण्यास तसेंच लेण्यास चिरगुटपांघरून देण्यास आणि सदहू महादेवाची पुजाअर्चा उत्तम प्रकारें करण्यासाठीं लावली आहे. परंतु देवाची तजवीज व त्याच प्रमाणें माझ्या खाण्यापिण्यास व लेण्याची तरतुद तुमचे कडून बरोबर होत नाहीं तीं तुह्मी माझ्या नवऱ्याचे हयातीच्या वेळीं कबूल केल्याप्रमाणें करण्याबद्दल मला लिहून द्याल तर मी ही मालमिळकत तुह्माकडे राहूं देईन. नाहीं तर दुसरी तजवीज मला योग्य दिसेल ती करीन. या नोटीसीचें उत्तर मला ८ दिवसांत देणें व नोटीशीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल. कळावें. ता० २८।१।१९१० इ०

सही

तुळसा मर्द जैराम रोही राहणार वडाळी निशाणी खुद्द आंगठा.

नो. नं. ट. ६५

## नोटीस

रा. रा. काशीराव वल्द सुर्यभान वसो राहणार नेहोरी बु. ता० आकोट जि० आकोला यांस:—

खालीं सही करणार राहणार नेहोरी बु० यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी मजला ता० ६।१।१० इसवीची नोटीस दिली कीं मौजे मजकूर येथील सर्वे नंबर १३ या बद्दल ८८ हिस्सा विकणें आहे तुह्मास घेणें असल्यास ८ दिवसांत कळवावें अशी नोटीस दिल्यावरून कळविण्यांत येतें कीं सदहू शेत आह्मीं तुह्मास पिकाचा उपभोग घेण्यास दिलें आहे. खरीदी किंवा गहाण देण्याचे तुमचे हक्क नाहीं तुमचे बाप सुर्यभान पाटील याचें पालनपोशण आमचे बाप आनंदा पाटील यांनीं केलें व मरते वेळीं तुह्माकरतां उदरपोशणासाठीं हें शेत दिलें. सबब तुह्मास विकण्याचा हक्क नाहीं. जर कोणी खरेदी अगर गहाण घेईल तर त्याचा हक्क राहणार नाहीं. या करीतां तुह्मी विकल्यास मी खरेदीखत रद्द समजून पुढें तुमचे ताब्यांतून शेत परत घेतलें जाईल कळावें तारीख १०।२।१० इ. सही

रामराव आनंदराव देशपांडे द. खु.

नो. नं. ट ६६

## आर्यवनौषधालय मुर्डी

हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील-आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमची औषधें बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत यांतून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकट आम्हास दिले आहे हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच । औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजीविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शारीरिक सुखाचा राजा जी धातु ती शुद्ध असल तरच शरिर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होते ती दोषी असेल तर शरीरांत नाना कारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातु शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरिर निमरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नावस्था धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार संकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, तळ पायांची आग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडुरोग, मुदतीचा ज्वर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. रक्तरोग, धुपणी जुनाट परमा, मुष्ठमैथूनने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबुत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचू लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें यास पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्हॅ. पीनें खालील पत्त्यावर मिळतील.

दर:-एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११५ गो ३ रु १५५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजन:-यानें रतांधळ, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरित बरें होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अगदी रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रण:---कोणताही नवा जुना परमा व सडक्या दह रितीक मुताची जळी, संकोच पुयस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दसत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक पूड:-दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे .

५ विंचूचें विष:-औषध लावतांच उतरतें मुकीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्ण:-खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ७ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वर:-औषध घेताच कशाही प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुन: उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषध:-आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो

९ सामानाचा मोठा वयाटलाग मागव तो फक्त पाठवूं आमचांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म पाक. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्हो. पी. नें पाठवूं प्रकृतिचें मान कळविल्यास रोगाचें निदान चिकित्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक आपला समाज निरोगी असावा अशा बनल्यामुळें एकदा जो धंदा सुरू केली त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ० प्रांतांत ऊत आला असून आमच्या आजोबा वगैरे गावांतून तो पुणावर्हैत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक यांची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपापले थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्य कारखाना आज सतत १५।२० वर्षे अव्याहत सुरू असून ज्यांच्य औषधा घोले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधीनें कित्येक ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषधे नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रितीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारीत असले । व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आजपर्यंत आमचे खटपटीस यशहि बरेंच आलें आहे, करितां सकळ आप्त बंधुस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, येनकेन प्रकारे आमचीच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावा, एकवार अनुभव घ्यावा खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्त्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

**ORIENTAL GOVERNMENT**

# LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

**FUNDS EXCEED THREE CRORES AND THIRTY LAKHS**

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

there be one thing of more importance in Life Assura claims arise, that the amount due under the Policy are paid to the e iest possible date. This the Directors of the Oriental ko p we up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

It s not sufficient to read that a Compy's funds amoun m k how such in esiecellaneous inves s red

The Funds of the 'Orienta' are invested in Government and lodged with the vnt Official Trustee of Bombay in o Company' Security fo arising through decease of an es. endowment polici esmatured.

Government Officer, Professional men, Tradesmen and others employing of their annual income or profits in effecting life polici era fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may have money yet if he dies ear y, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which obis danger is got over. Life being so uncertain, the sooner a man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family withou the intended provision.

Influential and energetic Agent wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses forms, and any further information can be obtained

M. DESOUZA,

CHIEF AGENT.

Nagpur.

---

हें पत्र आकोला येथे कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.